म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. [illegible]

# धर्मात्मा

# सनजी राजारामका



REFBK-0015289

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ..५९५६५.. वि: ..... .. .....
क्रमांक ........................ नोंद दि: १०-१०-८०

# तुमसरचा दानी धर्मात्मा

## रायसाहेब श्री. सेठ गोपीकिसनजी राजारामका

यांचा

## जीवन-परिचय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२८९
ग्रंथ शाखा
REFBK-0015289

श्री. कृ. ल. निवाण
'श्रीराम नगर' तुमसर.

प्रकाशक :

रायसाहब गोपीकिसनजी अग्रवाल,
चॅरिटेबल ट्रस्ट,
तुमसर.

प्रथमावृत्ति : वि. संवत २०२२
सौर शक ~~१८८७~~
२४.१९६५

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

प्रति १५००

मूल्य १-५० पैसे

मुद्रक :

पां. ना. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर १.

कै. लहूजी राघव निर्वाण

बाळपणीच ज्यांच्या वात्सल्याला मुकलो,
आणि आज केवळ पुसट स्मृतिरूपानेच
हृदयात चिरंतन वावरणाऱ्या आमच्या
तीर्थरूपांचे चरणी हे पुष्प सादर समर्पण!

★



श्री. सेठ गोपीकृष्णजी राजारामका

# आरंभिका

रायसाहब सेठ गोपीकिसनजी के सम्बन्ध में लिखते समय मन को संकोच होता है। क्यों कि मैं जानता हूं कि उनके जीवन की मधुरता का विवेचन करने में असमर्थ रहूंगा। तुमसर में राजारामका–परिवार की लगभग पांच पीढ़ियां मेरे सामने से गुजर रही हैं। स्व. रायबहादुर सेठ गोवर्धनदासजी एवं उनके उत्तराधिकारी रायसाहब सेठ गोपीकिसनजी ने जनता के लिये जो देन दिया है–उसको भुलाया नहीं जा सकता। इन्हों ने अपनी सम्पत्ती का अधिकांश अंश जन-काज के लिये खूबसूरती के साथ किया है। रायसाहब दातृत्व, धर्मनिष्ठा, अतिथीसेवा, हृदय की कोमलता और वाणी की मधुरता से भी मेरा परिचय है। वैदिक आचार–विचार का अनुसरण करके वर्तमान के भौतिक वादी युग में गो, द्विज और पंडितों की अभ्यर्थना करके आप भारतीय संस्कृति का वास्तव में परिष्कार कर रहे हैं। गीता में वर्णित वैश्य स्वभाव की झलक भी मैं रायसाहब में पाता हूं। इसी

कारण उनके विविध गुणोंपर मैं स्वयं मुग्ध हूं और भगवान उनकी यह वृत्ति बनाये रखे–यह कामना है।

तुमसर के शिक्षक श्री. कृष्णराव ल. निर्वाण ने 'तुमसरचा दानी धर्मात्मा' पुस्तक लिखकर मराठी जनता के सामने रायसाहब का परिचय प्रेषित किया है। मैं उनका अभिवंदन करता हूं और समझता हूं कि जनता भी इसे चावसे अपनावेगी।

मोर हिन्दी–भवन,
नागपुर १.
कृष्णाष्टमी सम्वत् २०२२

**प्रयागदत्त शुक्ल**

# लेखकाचे मनोगत

धर्माज्ञा शिरि वंद्य मानुनि जनां सर्वत्र संतोषिले ।
दानाचें व्रत आचरोनि जिवनी कर्णासहि स्पर्धिले ।।
दीनाचा कनवाळु ज्या प्रिय असे सत्संग देवाऽर्चना ।
दीर्घायूच करो तुम्हास प्रभुजी ही आमुची प्रार्थना ।।

( रचयिता--प्र. ग. देशपांडे )

तुमसर नगरीतील 'दानी धर्मात्मा' अथवा 'दानी कर्ण' म्हणून केवळ आपल्या महाराष्ट्रातीलच नव्हे, तर प्राय: अखिल भारतवर्षातील विशेषतः धार्मिक प्रवृत्तीचे नि सामाजिक कार्यकर्ते ज्यांना ओळखतात, अशा 'धर्मभूषण' रा. सा. श्रीसेठ गोपीकिसनजी अग्रवाल राजारामका यांचे प्रस्तुत चरित्र वाचकांच्या हाती देताना किती सात्विक आनंद वाटत आहे म्हणून सांगू ?

विविध प्रकृती आणि प्रवृत्तीच्या थोर विभूती, समाजातील अशांती, दु:ख, विषमता व दारिद्रय दूर करण्यासाठी निरपेक्ष सात्विक वृत्तीने जिवापाड झटताना आपण बघतोच ना ?

—आणि अशा ह्या थोर लोकाग्रणीतील महान् धार्मिकतेचा पुजारी, थोर गृहस्थी संत, असामान्य धर्मश्रद्धाळू आणि पौराणिक काळातील कर्णाप्रमाणे आजचे जगही आश्चर्याने थक्क होईल असा 'दानी' पुरुष म्हणजे प्रस्तुत पुस्तकाचे चरित्रकार आपले रायसाहेब सेठ गोपीकिसनजी !

कुणाची अवास्तव स्तुती म्हणून नव्हे तर, अगदी 'चक्षुर्वै सत्यं' सांगायचे म्हणजे लक्ष्मीचा वरद हस्त असलेले आणि ऐश्वर्य–श्रीमंतीच्या उच्च शिखरावर आरूढ होण्याचा योग दयाळू परमेश्वराच्या असीम कृपाप्रसादे ज्यांना लाभला आहे, असे हे सेठजी 'श्रीमंत' म्हणून सुपरिचित आहेत, त्यापेक्षाही काकणभर अधिकच मोठेपणा त्यांच्या सोज्वळ सात्त्विक अंत:करणातील आचार–विचारात आहे !

आणि म्हणूनच 'साखर' म्हटली, की तिच्या गोडीची आठवण जशी चटकन यायची, तसे तुमसरच्या ह्या महान 'धर्मप्राण' असणाऱ्या सेठजींचे स्मरण झाले की, 'तो एक महान धार्मिक श्रद्धाळू; भारतीय संस्कृतीचा आत्मा; सनातन हिंदू संस्कृतीचा उपासक; दु:खी जनांचा कनवाळू, पंडित, संत–महात्म्यांचे आश्रयस्थान आणि समाजातील सानथोर सज्जनांचा दु:खनिवारक कैवारी—किती किती प्रकारे वर्णन करावे—हे त्यांचे सारे चित्र डोळ्यापुढे येते आणि वाटते, तुमसर नगरात अशा थोर विभूतीचे जीवन घडविण्यातही त्या सर्वव्यापी दयाघन परमेश्वराचाही काही थोर हेतू असावा ! आणि म्हणूनच 'दानवीर' ह्या सार्थ विशेषणाला पात्र असणाऱ्या रायसाहेबांचे हे अल्पसे जीवन-चरित्र वाचकांसमोर सादर करायचे जे सौभाग्य मला लाभले त्यामुळे

मुक्या मनाने किति उधळावे—
शब्दांचे बुडबडे ?



श्रीहनुमान तलावाच्या उद्यानात स्व रा. ब. सेठ गोवर्धनदासजींची डौलदार घडणीची छबी.
रा. सा. समाधीसमोर उभे आहेत.

अशा मन:स्थितीत मी अधिक काय नि कसे विशद करू हेच मला कळत नाही !

गतवर्षी मी 'तुमसरचा देवमाणूस' म्हणून येथील स्व. रा. ब. श्रीसेठ श्रीरामजी सराफ यांच्या पुस्तकाची द्वितीय आवृत्ती त्यांच्या 'रिलिजेस अँड चॅरिटेबल ट्रस्ट' तुमसर तर्फे प्रकाशित केली आणि त्या आवृत्तीच्या सुमारे पंधराशे प्रती महाराष्ट्र राज्यातील सर्वच शासकीय वाचनालयातून 'वाचनीय पुस्तक' म्हणून वितरितही केल्या गेल्या !

आणि आता हे 'दुसरे पुष्प' पण तशाच प्रकारे महाराष्ट्राच्या सुबुद्ध नागरिकापासून तो खेड्यापाड्यातील असंख्य जिज्ञासू वाचकांच्या नि ग्रामविकासाची खरीखुरी तळमळ बाळगणाऱ्या ग्रामीण नवयुवकांच्या हाती पडावे, तुमसरच्या ह्या सुविख्यात 'दानी धर्मात्म्या'ची 'पुस्तक' रूपाने का होईना बारकाईने ओळख व्हावी, आणि नवराष्ट्राची सुयोग्य घडण घडविण्यासाठी समाजातील एक आदर्श 'समाजसेवका'च्या नात्याने त्याने स्वत:च्या जीवनाचा प्रवाह 'धर्मप्रधान' स्वरूपात संस्कारक्षम करून कमीत कमी 'आदर्श नागरिक आणि स्वत:चे राष्ट्रीय कर्तव्य' याबाबतीत स्वत:च्या आचरणाची काही विशिष्ट दिशा ठरवावी, ह्याच सोज्वळ हेतूने प्रस्तुत 'पुष्प' गुंफले असून ह्या दानवीराच्या चरित्रातील एक शतांश वाटा जरी वाचकांनी स्वत:च्या जीवनात आणून 'समाजसेवा' करण्याचा निश्चय प्रत्यक्षत: कृतीत आणला, तरीही हे पुस्तक लिहिण्याचे माझे सार्थक झाले असे वाटून मला समाधान वाटेल यात शंका नाही !

प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची स्फूर्ती मिळाली मला पितृतुल्य असलेले आपल्या लोकप्रिय 'तरुण भारता'चे (नागपूर आवृत्ती) सुपरिचित प्रधान संपादक आणि सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याच प्रेरणेने ! याप्रसंगी त्यांनी मला वेळोवेळी यथोचित मार्ग-दर्शन तर केलेच, आणि स्वतःच्या अधिकारवाणीने मंगल आशीर्वाद देऊन प्रोत्साहित पण केले, त्याबद्दल मी त्यांचे कसे नि कोणत्या प्रकारे आभार मानू हेच कळत नाही !

तसेच हिंदीचे प्रगाढ पंडित आणि हिंदी राष्ट्र भाषेचे थोर साहित्यिक पं. प्रयागदत्त शुक्ल, मोर हिंदी भवन नागपूर १ यांनी पण वेळात वेळ काढून प्रस्तुत पुस्तकास प्रस्तावना लिहून देऊन उपकृत केले. त्याबद्दल त्यांचाही पण मी फार फार आभारी आहे !

नागपूरच्या 'आलोक' ह्या हिंदी मासिकाचे प्रधान संपादक आणि सुप्रख्यात गोभक्त श्री. विश्वंभरप्रसाद शर्मा यांच्या संचालकत्वाखाली रायसाहेबांच्या चरित्र आणि विचारांच्या आधारे जो विशाल अभिनंदन ग्रंथ त्यांच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित झाला, त्या ग्रंथाचीही सदर पुष्प गुंफण्यासाठी बरीच सहाय्यता मिळाली; सेठजींच्या येथील दातव्य औषधालयाचे प्रधान चिकित्सक आणि विद्वान संस्कृत पंडित श्री. वैद्यराज विश्वनाथजी जोशी, आयुर्वेदाचार्य, तसेच सुविख्यात विद्वान संस्कृतज्ञ पंडित श्री. शिवदत्तशास्त्रीजी, साहित्यरत्न, विद्यालंकार ह्या प्रगाढ पंडिताबरोबरच येथील लोकप्रिय दु. मामलेदार श्री. प्र. ग. देशपांडे यांनी पण मला ह्या कामी भरीव स्वरूपाचे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ... ति: ...
क्रमांक ... नों: दि: ...

सक्रिय सहकार्य दिले आणि त्यामुळेच अल्पावधीत पुस्तकाचे लेखनकार्य पार पडू शकले. तेव्हा ह्या सर्व जाणत्या मंडळींचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

पण पुस्तक लिहिण्याची मूळ कल्पना स्फुरली ती आपल्या विदर्भ ग्रंथालय संघाचे नागपूरचे कर्तव्यदक्ष कार्यवाह श्री. पां. श्री. फडके आणि शासकीय ग्रंथालयाचे कुशल संचालक श्री. चिचवडकर यांच्याच प्रेरणेने आणि म्हणून ह्या 'राम–लक्ष्मण' जोडीचे पण मी अगत्यपूर्वक आभार मानलेच पाहिजे !

आणि आता शेवटी बोलायचे म्हणजे आपल्या महाराष्ट्र राज्यात मागील सतत तीन वर्षांपासून मुद्रण स्पर्धेत पुस्तक छपाईसाठी प्रथम क्रमांकाचे मानकरी म्हणून मान्यता पावून प्रत्येक वेळा राज्यपातळीवरील पारितोषिके पटकविणाऱ्या 'नारायण मुद्रणालय' धनतोली, नागपूर १ चे संचालक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी अत्यंत अल्पावधीत पुस्तकाची सर्वांगसुंदर व आकर्षक अशी छपाई करून दिली आणि माझे प्रेमळ मित्र, आर्टिस्ट व सुप्रसिद्ध चित्रकार श्री. महाकाळकर यांनी मुखपृष्ठ सुबक रीतीने काढून देऊन कृतार्थ केले, त्याबद्दल वरील सर्वच प्रेमी मंडळींचा मी फार फार आभारी आहे. याशिवाय विशेष काय ?

सर्वे सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।

'श्रीरामनगर,' तुमसर—
अक्षयतृतीया, शके १८८७
दिनांक ४ मे १९६५

कृ. ल. निर्वाण

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | थोरांचे शुभेच्छा संदेश | १ |
| २. | जन्म व बालपण | १९ |
| ३. | तुमसरात पदार्पण | २३ |
| ४. | जनसेवेचा श्रीगणेशा | ३२ |
| ५. | त्यांचे व्यक्तिमत्व ! | ४१ |
| ६. | ५१ वा वर्धापनदिन समारंभ | ४८ |
| ७. | रायसाहेबांचे मौलिक विचार | ५६ |
| ८. | कांही स्मृती–फलके | ८० |



महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्रीप्रकाश आणि केंद्रीय अर्थमंत्री
श्री. मोरारजी देसाई यांचे सोबत श्री. गोपीकृष्ण अग्रवाल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. १५२८९

# शुभेच्छा संदेश

श्रीमान् रा. सा. सेठ गोपीकृष्णजी [illegible] यांच्या ५१ व्या वाढदिवसाचे निमित्ताने देशातील अनेक विद्वान् व निरनिराळ्या क्षेत्रातील थोर नेत्यांचे जे शुभेच्छा संदेश आलेत, त्यांचा मराठी अनुवाद खाली संकलित करून दिलेला आहे—

## श्री गोवर्धनपीठाधीश्वर श्री १००८
## जगद्गुरु श्री शंकराचार्य भारती कृष्णतीर्थ स्वामी

ब्रम्हाणं स्वीयनाभिप्रभवकमलत: प्राग्विधायाथ तस्मै
लीलान्यायेन नैजश्वसितसृतिमिव प्राहिणोदप्रयत्नम् ।।
यो वै वेदांश्च लोकत्रितयसृजिकृते स्वात्मबुद्धिप्रकाशं
वन्धव्रातान्मुमुक्षु: शरणमहमये देवतासार्वभौमम् ।।१।।

चराचरजगज्जनिस्थितिलय स्वलीलालव
स्थिरास्थिरविवेचनप्रभृतिसाधनस्पर्शकम् ।।
सुरासुरपरम्पराप्रणतवादपाथोरुहं
धराधरसुतासुतं शरणमेमि विघ्नापशम् ।।२।।

विलक्षणसुलक्षणं सकलशास्त्रसंशिक्षणं
सरोजनिनिजेक्षणं सुखतदन्यतुल्यये क्षणम् ।।
कृतिव्रजविचक्षणं श्रितजनालिसंरक्षणं
भजे गुरुमनुक्षणं भजदघावलीमोक्षणम् ।।३।।

संघातसंघात भयेन बुद्धा–
पार्थाय पार्थाय पुरा श्रुतीनाम् ।।
सारांश सारांशमुवाच यः स्व–
गीतासु गीतासु तमीशमीडे ।।४।।

भूयो भूयोजन्ममृत्युप्रवाह–
स्वान्तस्वान्त ध्वान्त विध्वंसनार्थम् ।।
तत्वा तत्वातीततत्वस्वतत्वं
भूभृद्भूभृज्जन्मजानिं प्रपद्ये ।।५।।

[ याप्रमाणे श्रीशंकराचार्य भारती कृष्णतीर्थ स्वामींनी ४० संस्कृत श्लोकांच्या रचनेत रायसाहेब सेठ गोपीकृष्ण-जींना शुभाशिर्वादयुक्त संदेशात त्यांच्या ५१ व्या वाढ-दिवसाचे निमित्ताने सेठजींचे अभीष्टचिंतन केले आहे. ]

## श्री द्वारकाशारदापीठाधीश्वर श्री १००८ जगद्गुरु श्री शंकराचार्य श्रीमदभिनव सच्चिदानंद तीर्थ स्वामी

### आशीरभिनन्दनम्—

औदार्यमीश्वरे भक्तिर्दयादाक्षिण्यसम्पदः ।
गोपीकृष्णे विराजन्ते नैकत्र सुलभा अपि ।।१।।

पूर्वजन्मकृतानां हि पुण्यानां परिपाकतः ।
विशिष्ट गुणयोगेन राजते श्रेष्ठिपुंगवः ।।२।।

गोपीकृष्णमहाभागवर्धापनमहोत्सवम् ।
अभिनन्द्य वितन्यन्ते शुभाशीराशिसम्पदः।।३।।

सार्वत्रिकं सार्वदिकं ऐहिकामुष्मिकं परम् ।
श्रेयो भूयाद्भगवतः प्रसादात्कमलापतेः ।।४।।

**राजगुरु-श्री. पं. शिवदत्त शास्त्री साहित्यरत्न,**
विद्यालंकार; तुमसर

अनन्त मानन्द ममन्द मारादाराधिता या तनुते नुतेषु ।
रसैरुपेता नवभिर्नवीनैः सा भारती पातु भवे भवार्तान् ॥१॥

यस्याभिनन्दनमहं परितः प्रवृद्धं-
द्रष्टुं रमापि रभसादगमज्जनस्य ।
सोयं महोदयवरः किल कोऽपि गोपी-
कृष्णः सदा विजयते निजवंशमौलिः ॥२॥

भाग्योदयेन भुविदत्तकतामुपेत्य
नानाविधार्थिजन काम समर्धनाय ।
कल्पद्रुमायित मगादिह यः स्ववित्तैः
सोयं कृती विजयते जनजातवन्द्यः ॥३॥

धर्मे मतिं कुरुत संस्कृतवृद्धयेत्र
वित्तानि यच्छत सनातनधर्मभूत्यैः ।
सर्वस्वमर्पयत सात्विकदानयोगा-
दित्येव यस्य जनतासु गिरां प्रसारः ॥४॥

संस्थाप्य येन किल संस्कृतपाठशाला
प्रान्ते सनातनपथप्रथनाय दिव्याः ।
देवद्विजार्चनपरेण धृतातिभव्या
'सद्धर्मभूषण' इति प्रथिता प्रतिष्ठा ॥५॥

कृतद्विजार्चः प्रणयेन गोपीकृष्णाभिधोयः पवनात्मजस्य ।
नितान्तभक्तः स्वपुरे समन्तात्तनोति धर्मार्जनमप्रमत्तः ॥६॥

जयाय धर्मस्य पराजयाय प्रवृद्ध पापस्य बहु श्रमेण ।
जनेषु सद्भावनिवेशनाय न किं कृतं येन जगाद्धिताय ।।७।।

क्वचिद्विचित्रं जल यन्त्र तन्त्रं क्वचिन्नवोद्यानमनेकचित्रम् ।
विधाय संदर्शितमात्मवित्तं परोपकाराय धृतव्रतेन ।।८।।

शतार्धमानं स्ववयः समाप्य
तदग्रिमेर्धे कृतपादचारः ।
स एव पुण्यार्जितदिव्यकीर्ति
श्चिराय जीव्यादिति मेभिलाषः ।।९।।

यस्यानवद्य चरितस्य मयाद्य गोपी–
कृष्णस्य दर्शितमदश्चिरितं स लोके ।
भूयाच्छतायुरिदमेव निवेदयित्वा
हर्षोदयाद्विरमते शिवदत्त शास्त्री ।।१०।।

## राष्ट्रपती श्री. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

"श्री गोपीकृष्णजींच्या जनसेवेचा परिचय मिळून मनाला अत्यंत प्रसन्नता वाटली. मी आपली शुभकामना प्रकट करतो आणि सफलता इच्छितो."

## भूतपूर्व केंद्रीय गृहमंत्री स्व. पं. गोविंदवल्लभ पंत

"श्री सेठ गोपीकृष्णजींच्या अभिनंदन समारंभाचे आमंत्रणपत्र मिळाले. त्यांना माझे धन्यवाद व शुभकामना प्रेषित !"

## केंद्रीय संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण

"सेठ गोपीकृष्णजी राजारामका यांनी देश व समाजाची तन, मन, धनाने केलेली सेवा प्रशंसनीय अशीच

आहे. त्यांच्या सेवेमुळे राष्ट्राच्या प्रगतीस सहाय्यता मिळाली आहे !"

### केंद्रीय मंत्री श्री. स. का. पाटील

"उद्योग व व्यापारांत अमाप संपत्ति संपादूनहि, भारतीय सभ्यता, संस्कृति आणि प्राचीन परंपरेला त्यांनी कायम ठेवले आहे."

### रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. मा. स. गोळवलकर (गुरुजी)

"रा. सा. सेठ गोपीकृष्णजीशी माझा चांगला परिचय आहे. त्यांची दातृत्वता व धर्मपरायणता यामुळे तर मी बराच प्रभावित झालो आहे.....मी त्यांचेविषयी आपली शुभकामना पाठवीत आहे !"

### पंजाबचे भूतपूर्व राज्यपाल श्री. न. वि. गाडगीळ

"....सेठजी स्वतःच्या उदाहरणाने धनाची शोभा दान आहे, हेच जणु सिद्ध करतात ! "दानः समविभागः" अशीच दानाची व्याख्या असून "तेन त्यक्तेन भुंजीथाः" ह्या आदर्शाचे पालन करणाऱ्या व्यक्ती भारतात ज्या अत्यल्प आहेत, त्यात सेठजींचे स्थान अग्रेसर आहे !"

### महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल श्रीप्रकाशजी

"... सेठजी आमच्यात पुष्कळ दिवसपर्यंत राहोत, व त्यांचे हातून उत्तरोत्तर अधिक जनसेवा घडत राहो, हीच मंगल कामना !"

## राजस्थानचे मुख्य मंत्री श्री. मोहनलालजी सुखडिया

"....श्री गोपीकृष्णजींनी समाजकल्याणाच्या भिन्न भिन्न क्षेत्रात नेहमीच सहयोग दिला आहे, व धन आणि उदारता यांचा समन्वय त्यांनी फारच उत्तम रीतीने घातलेला आहे."

## पंजाबचे मुख्यमंत्री स्व. श्री. प्रतापसिंह कैरॉं—

"....सेठ गोपीकृष्णजींनी स्वत:च्या जीवनात, धर्म, संस्कृती, व्यापार, सत्यता आणि राष्ट्रभक्ती यांची जी परंपरा निर्माण केली आहे, ती सर्वांकरिता अनुकरणीय अशीच आहे."

## महाराष्ट्र राज्याचे माजी विकास व उद्योगमंत्री श्री. शे. कृ. वानखेडे

"....सेठ गोपीकृष्णजींकडून देशासाठी अधिकाधिक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्य होत राहो हीच परमेश्वरापाशी शुभकामना !"

## मध्यप्रदेश विधानसभेचे अध्यक्ष श्री. पं. कुंजीलालजी दुबे

"सेठजी एक आस्तिक भक्त आहेत....विद्या व विद्वानांचे बाबतीत त्यांची प्रखर निष्ठा असल्यामुळे विद्वान् त्यांच्याकडून 'पूजिले' जातात ! कोणत्याही शुभकार्यात दान दिल्यावर त्यांना प्रसन्नता वाटते व ह्या सद्‌गुणामुळेच ते लोकप्रिय आहेत !"

## म. प्र. चे भूतपूर्व उपमंत्री श्री. मथुराप्रसादजी दुबे

"....श्री. गोपीकृष्णजी सार्वजनिक व धार्मिक कार्यात बरेच लक्ष घालतात व त्यामुळेच देशातील बऱ्याचशा

संस्थांचे कार्य सुरळीतपणे चालू आहे ! सन १९२२–२३ पासून ते माझे सहाध्यायी आहेत. स्वतःच्या जीवनात त्यांनी सफलता प्राप्त केली आहे !"

## महाराष्ट्र राज्याचे माजी विधानसभा उपाध्यक्ष, श्री. दिनदयाल गुप्त

"....सेठ गोपीकृष्णजीसारख्या दिव्य ज्योतीपासून अनेक दीप प्रज्वलित होत असतात. सेठजींचे जीवन दीर्घ, स्वस्थ होवो व समाजाच्या उच्च आदर्शाकरिता ते नेहमीच स्फूर्तिप्रद व सिद्ध होत राहो !"

## लोकसभासदस्य, श्री सेठ गोविंदासजी

"....श्री गोपीकृष्णजी धार्मिक प्रवृत्तीची महान् व्यक्ति आहे. त्यांची धार्मिक प्रवृत्ती व उदारता ह्यामुळे ह्या धर्मप्राण देशात, नव्या पिढीचे निर्माणकार्य निर्भर होण्यास बरीच मदत मिळत आहे."

## मध्यप्रदेशाचे उपराजस्वमंत्री श्री. जगमोहनदासजी

....सेठ गोपीकृष्णजी अग्रवाल यांचेकडून अनेक सांस्कृतिक व धार्मिक कार्ये केली जात आहेत ! त्यांचे ते कार्य खरोखरच अभिनंदनीय होय.

## मध्यप्रदेशाचे भूतपूर्व वित्तमंत्री श्री. मिश्रीलालजी गंगवाल

सेठ गोपीकृष्णजींची दानशीलता, सहृदयता आणि धर्मपरायणता अनुकरणीय अशीच आहे. त्यांनी जनसेवेच्या क्षेत्रातही अविस्मरणीय कार्य करून 'अर्था'ला सार्थकी लावले आहे !

## राजस्थानचे ( भरतपूर ) भूतपूर्व राजस्वमंत्री
## श्री. ठाकूर देशराजसिंह

....शेखावटीशी माझा संबंध 'किसान आंदोलनामुळे' बराच जुना असून तेथील दानवीर सेठ सावकारांच्या सार्वजनिक सेवाभावामुळे मी विशेष प्रभावित झालो आहे. आणि श्री सेठ गोपीकृष्णजींनी तर शिक्षणक्षेत्रांत मोठेच कार्य केले आहे.

## मध्यप्रदेश विधानसभेचे भूतपूर्व अध्यक्ष
## श्री. घनश्यामसिंह गुप्त


....परमात्मा रा. सा. सेठ गोपीकृष्णजींना चिरायु ठेवो आणि देश व धर्माच्या त्यांच्या सेवाकार्याचा जनतेला अधिकाधिक अखंड असा लाभ होत राहो, हीच सदिच्छा !

## म. प्र. चे मुख्यमंत्री सागर विश्वविद्यालयाचे उपकुलपती
## श्री. द्वारकाप्रसाद मिश्र

....सेठजी अनेक वर्षांपासून सार्वजनिक सेवा करीत आले आहेत. मी आपली शुभेच्छा पाठवीत आहे !

## राजस्थानचे सर्वात जुने अन् वयोवृद्ध पत्रकार
## झावरमलजी शर्मा

सेठसाहेब हे स्वत: शिक्षण, प्रेम, दानशीलता, परोपकार आणि आतिथ्यशीलता, इ. सद्गुणांकरिता प्रसिद्ध आहेत. तसेच देशोन्नतीच्या कार्यातही ते नेहमीच रुची घेत असतात.



केंद्रिय अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांचे सोबत रा. सा. सेठ गोपीकृष्णजी आणि श्रीमान् सेठ दुर्गाप्रसादजी सराफ 'हितगुज' करतांना.

## श्री संत तुकडोजी महाराज, गुरुकुंज मोझरी

अनेक उपयुक्त लोकोपयोगी संस्थांना प्रोत्साहन देऊन सेठजींनी आपला सेवाभाव व उदार हृदयाचा परिचय करून दिला आहे. धनाचा उपयोग समाज व राष्ट्राची उन्नती करण्यास सेठजींची वृत्ति नेहमी जागृत राहो आणि त्यांना दीर्घायुष्य प्राप्त होवो हीच शुभकामना !

## जुन्या मुंबई राज्याचे माजी समाजकल्याण मंत्री, श्री. ना. खं. तिरपुडे

रा. सा. सेठ गोपीकृष्णजी दानी व सत्संग प्रेमी आहेत. मंदिरे, धर्मशाळा व सार्वजनिक संस्थांच्या निर्मितीत त्यांना मोठी रुची आहे. विविध क्षेत्रातही त्यांनी ठोस अशी मदत दिली आहे.

## राजस्थानचे भूतपूर्व गृहमंत्री व राजस्थान पंचायत राज्य संघाचे अध्यक्ष श्री. चौधरी कुंभारामजी आर्य

सेठ गोपीकृष्णजींनी आपल्या अर्जित धनाचा, लोककल्याणासाठी भरपूर विनियोग केला आहे. राजस्थानच्या धनवान लक्ष्मीपुत्राप्रमाणे त्यांनी आपला आदर्श सक्रीय रीत्या दिग्दर्शित केला आहे. सेठजींचा हा आदर्श जर देशांतील धनवान सावकारांनी गिरविला, तर देशातील अनेक प्रश्न चुटकीसरसे सुटणार नाहीत कां ?

## आयुर्वेदबृहस्पती, आयुर्वेदमार्तंड श्री. पं. सीतारामजी मिश्र, आयुर्वेदाचार्य, मुंबई

सेठजी म्हणजे सात्विक जीवन, उदार प्रवृत्ति व सहृदय स्वभावाची सोज्वळ मूर्तीच ! स्वतःच्या संपत्तीचे लोकोपकाराकरिता दान करणारे त्यांच्यासारखे पुरुष विरळाच !

आदरणीय सेठसाहेबांनी आयुर्वेदाच्या उत्थानासाठी फारच मोठे कार्य केले आहे. धन्वंतरी महाप्रभू त्यांना दीर्घजीवी ठेवो, हीच शुभेच्छा !

## मध्यप्रदेश विदर्भाचे माजी वित्तमंत्री श्री. ब्रिजलालजी बियाणी

नागपूरला, मध्यप्रदेश हिंदी साहित्य सम्मेलनाची जी भव्य इमारत निर्माण झाली व जे विशाल भवन सांस्कृतिक, सामाजिक व साहित्यिक हालचालींचे प्रमुख केंद्र बनले आहे, त्याच्या निर्मितीसाठी तुमसरच्या धनिकांनी केलेल्या योगदानात श्री. सेठ गोपीकृष्णजीही एक प्रमुख आहेत. त्यांच्या जीवनाची सरलता मी कधीच विसरूं शकत नाही !

## भारतातील प्रमुख मँगनीज उद्योगपती तथा तुमसरचे माजी नगराध्यक्ष श्री. सेठ दुर्गाप्रसादजी सराफ, तुमसर

रा. सा. सेठ गोपी कृष्णजींच्या मौल्यवान सेवेमुळे, आज लोक जशी सामाजिक कृतज्ञता प्रकट करतात, तशीच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........... वि: ........
क्रमांक ........... नों: दि: ........



प्रेरणा, त्यांचेपासून भावी पिढी पण घेत राहील, हे खास ! भारतीय संस्कृती आणि प्राचीन परंपरेशी दृढ निष्ठा असल्यामुळेच खरोखर आज ते समाजाचे प्रेरणास्रोत झाले आहेत !

## नागपूर हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश
## श्री. डॉ. भवानीशंकर नियोगी

देशात उद्योगपती व लक्ष्मीपुत्र पुष्कळ आहेत, पण त्यांचेसारखे धर्मनिष्ठ, जनसेवारत आणि मुक्तहस्त दानवीर मात्र विरळाच !

## दैनिक 'तरुणभारताचे' प्रधान संपादक
## श्री. ग. त्र्यं माडखोलकर

....पण केवळ धनच नव्हे, तर दानशूरता, धार्मिक वृत्ति आणि संस्कृतीच्या बाबतीत प्रगाढ निष्ठा यामुळेही श्री. सेठ गोपीकृष्णजींचे स्थान आदरणीय झाले आहे.

धनवान तर बरेच असतात, पण धर्म, समाज व देश या बाबतीत आपल्या कर्तव्याचे सतत स्मरण करून चालणारे विरळाच ! मी रायसाहेबांचे अभिनंदन करून त्यांना दीर्घायुष्य चिंतितो !

## दैनिक 'नवभारता' चे संचालक
## श्री. रामगोपालजी माहेश्वरी

श्री. सेठ गोपीकृष्णजी ही आपल्या प्रदेशातील एक भूषणावह व्यक्ती आहे. त्यांचे निरभिमानी व्यक्तित्व,

दृढ सांस्कृतिक आस्था, लोकोपकाराची प्रवृत्ती, सार्वजनिक कार्यातील रुची व स्वाभाविक असा उदारपूर्वक भाव इ. विशेष वं विशिष्ट गुण आहेत. त्यांना दीर्घायुष्य प्राप्त होवो, हीच शुभ कामना !

## हिंदीचे प्रख्यात लब्धप्रतिष्ठ लेखक, पत्रकार व भूतपूर्व संसद्सदस्य श्री. पं. बनारसीदासजी चतुर्वेदी

सेठजींनी शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात जी सहाय्यता दिली आहे, ती प्रशंसनीय अशीच आहे. परोपकारी व्यक्तींच्या गुणांची कदर ही केलीच पाहिजे. त्यामुळे अन्य सज्जनही त्यांचे अनुकरण करतील !

## स्वामी श्री. पुरुषोत्तमाचार्यजी महाराज, रामबाग-पंढरपूर

भारतीय कीर्तीचे प्रख्यात असे तुमसरवासी श्री. गोपीकृष्णजी राजारामका, भारतीय आदर्शाचा उच्चार केवळ वाणीनेच करीत नाहीत, तर निसर्गमूलक भारतीय आदर्शाचे प्रत्यक्षतः आचरण करून ते त्याचे पालनही करतात ! म्हणून मी आशिर्वाद देतो की, ज्यांच्या दानाने पुष्कळसे जीवात्मा तृप्त होतात, ते दानवीर ‘ चिरंजीव होत !

‘ यस्मिन् जीवति जीवन्ति । बहवः सोऽत्र जीवतु ’

## लोकसभासदस्य, श्री गजाधरजी सोमाणी

‘ रायसाहेब स्वभावतःच मोठे धर्मप्रेमी, परम्परावादी, गोब्राह्मण आणि भारतीय संस्कृतीचे पुजारी असूनही समाजसेवी व राष्ट्रवादी आहेत. त्यांनी आपल्या

उर्वरित सम्पत्तीचा विनियोग लोकसेवेच्या सार्वजनिक क्षेत्रात केला आहे. आणि म्हणूनच दानशीलता, सहृदयवृत्ति, धर्मपरायणता, लोकसेवा आणि धार्मिक परंपरेत अतूट श्रद्धा यांमुळे त्यांना अपार लोकप्रियता लाभली आहे !

## अखिल भारतीय संस्कृत साहित्य सम्मेलनाचे प्रधानमंत्री पं. केदारनाथ शर्मा 'सारस्वत'

लक्ष्मी सरस्वती यांचा असंभव वाटणारा समन्वय सेठजींत झाला आहे. सेठजींच्या जीवनाचे सत्य सार सांगावयाचे म्हणजे—

"**यत्र द्वयं श्रीश्च सरस्वतीच**" आणि दानशीलतेच्या बाबतीत—

"**आदानं हि विसर्गाय सत्यं वारिमुचामिव**"

—असे आहे त्यांच्या जीवनाचे सार !

## प्रसिद्ध उद्योगपती सेठ पूर्णमलजी जैपुरिया, कलकत्ता

परमेश्वरापाशी माझी प्रार्थना आहे की, श्री. गोपीकृष्णजींच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा सुखदायी असो. आणि समाजसेवा करण्यास ते चिरायु होवोत !

## श्री. व्यंकटेश भवनाध्यक्ष काशीनिवासी श्री. स्वामी बद्रीप्रपन्नाचार्यजी

धर्ममूर्ति श्री. सेठ गोपीकृष्णजींना माझा शुभाशिर्वाद ! त्यांच्या दानशूरतेमुळे त्यांचेशी संपूर्ण भारतवर्ष व धार्मिक समाज सुपरिचित आहे. उज्जैनीच्या कुंभमेळ्याच्या प्रसंगी, आम्हाला भागवताचार्य गोब्राह्मणसेवक

रा. सा. सेठ गोपीकृष्णजींच्या अंत:करणाचा परिचय झाला!

## गोरक्षण संस्थान (अमरावती) चे अध्यक्ष
## श्री. वल्लभदासजी राठी

सेठजींचे जीवन तर प्रत्येक क्षेत्रात कार्य करीत आहे. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की--

'शतेषु जायते वीरः सहस्रेषु च पंडितः ।
वक्ता दशसहस्रेषु त्यागी भवति वा नवा ।'

## आर्य प्रतिनिधी सभा--मध्यप्रदेश, विदर्भाचे मंत्री
## श्रीकृष्णजी गुप्त

आर्य प्रतिनिधी सभेच्या दयानंद भवनाच्या निर्माण कार्यासाठी रा. सा. कडे गेलो असता, त्यांच्यात जी सरलता, सहृदयता व सहिष्णुता मी बघितली, ती अन्यत्र पहावयास सापडली नाही !

## श्री. रामेश्वरलालजी नोपानी, कलकत्ता

'परमपिता परमेश्वराजवळ हीच प्रार्थना की, श्रीमान् रा. सा. सेठ गोपीकृष्णजी राजारामका यांचे आयुष्य दीर्घायु होऊन त्यांचे हातून अधिकाधिक जनसेवा होत राहो !

## माजी मंत्री स्व. श्री. आ. म. माकडे गुरुजी, तुमसर

रायसाहेबांचे अंतःकरण दयाळू तर खरेच, पण त्यांचेपाशी आलेली कुणीही संकटग्रस्त व्यक्ती ही हसत-मुखच जाणार ! त्यांनी अनेक ठिकाणी शाळा, विद्यालये,

 १५८६

दवाखाने, सूतिकागृहे, धर्मशाळा, मंदिरे, इ. समाजोपयोगी कार्ये करून जन व राष्ट्रसेवा केली आहे. ते मोठे दानी पुरुष आहेत !

## श्री. वृद्धिचंदजी पोद्दार, नागपूर

दानशूर म्हणून आपली कीर्ती सर्वत्र पसरली आहे. 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष' ह्या चार पुरुषार्थांत प्रथमचे तीन पुरुषार्थ आपणास लागू आहेत व चतुर्थ पुरुषार्थाच्या प्राप्तीसाठी आपल्या ठायी 'तत्त्वाचा' उदय होवो, हीच शुभकामना !

## नागपूरचे श्री. ए. एस्. बोबडे, श्री. एम्. एल्. वैद्य, श्री. जी. एल्. संघी, ॲडव्होकेट

रायसाहेबासारख्या सज्जन सेवकांची देशाला नितांत आवश्यकता आहे. उदार व सेवानुरागी वृत्तीमुळे सेठजींनी राष्ट्रकार्यात मोलाची अशीच भर टाकली आहे.

## श्री. भवानीशंकर, अकोला

सश्रीकः श्रितवल्लभः श्रुतिसरो विद्वज्जनेज्यापरः
स्फारोदारयशोदयोदयवरः प्रौढप्रतापोद्धरः ।
नित्यासेचनकः पवित्रपणको धीमानुदाराशयः
गोपीकृष्ण समाह्वयः सविनयो जीय्याच्चिरायार्य्यनः ॥

## पं. रामत्रीलोक ओझा, प्रयाग निवासी (ह. मु. नागपूर)

### दोहा

अचल हिमाचल निरनीधी । रबी ससी जोती सुहाये ॥
चिरंजीव गोपीकिसन ॥ कहत शारदामाये ॥

सवैया—ऐसे समै एक बीर लख्यो में ।
दानशिरोमणी गोपीकिसनजी ।।
दानकी धार अपार चलै जहं ।
दान प्रसंग चले दिन राती ।।
दानके बान कलान सुफैरत ।
पंडित वेद पढे दिन राती ।
दानके बान चलावत प्रेमसे ।
'दान बहादुर' गोपीकिसनजी ।।
दानके बान आकाशमें छायो ।
दान ध्वजा ध्रव लौ फहराती ।
राम त्रिलोक बिचारी कहे ।
तुमसर बीच दानी है गोपीकिसनजी ।
ऐसे समै कलीकाल करालमें ।
दानी भये अब गोपीकिसनजी ।
दान प्रभाव चहुं दिस मंडित ।
कीरती या जग धरम धुजाकी ।।
दानके बान आकाश पताल लो ।
छाय रहे जग कीरती माची ।।
दानको देख कि सम्भु दिनेश ।
रमापति आपकी रक्षा करेंगे ।।
दानको देख प्रसन्न कुबेर है ।
देर नहीं भंडार भरेंगे ।।
राम त्रिलोक कहे अति प्रेमसे ।
दान प्रतापसे काल डरेंगे ।।



महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचा सत्कार करतांना.
सोबत केंद्रिय अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई आणि डॉ. ना. भा. खरे.

(कवित) सदा संघ बोलो सदा संग डोलो ।
सदा संग खेलो मैं गोपीकिसन के ।
सदा साथ गावूं । दही भात खावूं ।
सदा ध्यान लावूं मैं गोपीकिसनके ॥
सदा साथ मंदिरमें जावूं मैं उनके ।
करुं साथ पूजा मैं गोपीकिसनके ।
सदा रामलीला सदा रास लीला ।
करुं साथ कीर्तन गोपीकिसनके ।
भनै नाथ त्रिलोक गोपीकिसनके ।
हृदयमें बसे उनके राधाकिसनजी ॥

(चौपाई) गोपीकिसन सुजान मैं गाऊं ।
सोती श्रवण सुधा बरसाई ॥
बालकालसे हरी श्री रीती ।
करत सदा रघुनायक प्रीती ॥
पुजा पाट आदि शुभ करमा ।
दान अनेक जज्ञै शुभधरमा ॥
जगन्नाथ जब दर्शन कीने ।
दान अनेक विविध बहु दीनै ॥
गया प्रयाग आदि सब कीने ।
करी सत् संगम हा मुद भीने ॥
गोपीकिसनकी अकत् कहानी ।
लिखो जथा मती सुनौ भवानी ।

## तुमसर नगरपालिकेचे लोकप्रिय अध्यक्ष
## श्री. केशवराव आत्मारामजी पारधे

....रा. सा. सेठ गोपीकृष्णजी राजारामका म्हणजे आमच्या तुमसर नगरीचे धर्मभूषणच ! त्यांचे जीवन धर्मप्रधान असून भारतीय संस्कृतीचे ते चालते बोलते प्रतीकच आहेत.

अचाट दातृत्वशक्ति, अभिजात परोपकारी स्वभाव, निर्मळ–सोज्वळ–सात्विक वृत्ती, पापभीरुता, परमेश्वरावर अपार श्रद्धा, धर्मप्रधान दैनिक दिनचर्या इ. गुणवैशिष्टया-मुळे 'तुमसरचा दानी धर्मात्मा' म्हणून रायसाहेबांनी आपले नाव खरोखरच अजरामर केले आहे !

अशा पुण्यशील, आधुनिक कर्ण धर्मात्म्याचे बाबतीत जेवढे लिहावे तेवढे थोडेच !

शेवटी अशा ह्या भारतीय संस्कृतीच्या चालत्या बोलत्या थोर व्यक्तीस परमेश्वर उदंड आयुष्य आणि आरोग्य प्रदान करो नि त्यांचे हातून अशीच जनसेवा घडत राहो, हीच त्या प्रभुचरणीं विनम्र प्रार्थना !

# तुमसरचा दानी धर्मात्मा

## जन्म व बालपण

श्री. गोपीकृष्णजी यांचा जन्म राजस्थानमधील डिडवाना जवळील कनवई गावी मिती फाल्गुन शुद्ध २ विक्रम संवत् १९६४ (मार्च १९०७ इ. स.) रोजी झाला. त्यांचे वडील श्री. सेठ भारमलजी यांची प्रापंचिक व आर्थिक स्थिती साधारण प्रतीचीच असली, तरी स्वभाव मात्र सात्विक, सौम्य व आतिथ्यशील असा होता. ते कट्टर धार्मिक प्रवृत्तीचे होते. गोपीकृष्णांची मातोश्री पण एक धर्मपरायणं व पतिव्रता साध्वी होती. आणि अशी ही ‘ लक्ष्मी-नारायणाची जोडी ’ आपला छोटासा प्रपंच गुण्यागोविंदाने चालवीत कालक्रमणा करीत होती !

### आणि भूमाताही रसरसली

भगवान् श्रीकृष्णाने गीतेत वर्णन केल्याप्रमाणे “कृषि गौरक्षा वाणिज्यं, वैश्यकर्म स्वभावजम् ” ह्या वैश्य वर्णाच्या आदर्श गृहस्थी जीवनानुसार सेठ भारमलजी आपला नेटका प्रपंच करण्यात समाधान मानीत होते. त्यांचेकडे अल्प प्रमाणात का होईना, पण व्यापार, शेती

व पशुधनही होते. ह्या साधूशील गृहस्थाचे घरी गाई-वासरांची खिल्लारे पण बागडत होती. अशा ह्या 'अंतरी निर्मळ। वाचेचा रसाळ' वृत्तीच्या भाग्यवान पित्याचे घरी आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला! 'गोपीकृष्ण' म्हणजे भाग्यवान भारमलजींचा द्वितीय पुत्र! पण ह्या बाळाचे जन्मकाळी काय आनंदाचे भरते! त्या मंगलमय वातावरणाचे स्वागत करायला भूमाताही रसरसली! 'सुजलां, सुफलां' अशा भूमातेने आपल्या कुशीतून त्या वर्षी सर्वत्रच फळे, फुले नि पिकांना अमाप प्रमाणात जन्म दिला! धनधान्याची रेलचेल! सर्वत्र समाधानाचे वातावरण!!

—आणि अशा ह्या परमपवित्र मंगल समयी हे भाग्यवान् बाळ ह्या भूतलावर भरतभूमीची व समाजाची उज्ज्वल सेवा करण्यास जन्मास आले!

बाळ गोपीकृष्ण बाळपणी 'कनवई' ह्या आपल्या जन्मगावीच बागडला, कुदला, अन् इतर बालकांप्रमाणे सवंगड्यांसह रमला.

## 'गोपाल—गोपीकृष्ण!'

बाळपणी घरच्या गाई रानात नेऊन चारणारा हा 'इवलासा पोऱ्या' पुढे तुमसरसारख्या छोट्याशा नगरीत येऊन वास्तव्य करील; आणि तो पुढे आपल्या कर्तृत्वाने नावलौकिकास चढून निरनिराळ्या क्षेत्रात 'जनसेवा' करीत राहील, असे कोणाच्या मनात तरी आले असेल का?

रा. क्र. १५२८८

आणि खरेच आहे, बालपणात यमुना नदीच्या त्या पवित्र तटावर गोपाळ–गवळ्यांच्या मुलांसोबत स्वतःच्या सवंगड्यांसोबत ‘ गोऽड ’ बासरीच्या सुरम्य सुराचा मंजुळ ध्वनी दाही दिशात प्रसारित करीत ज्या कृष्णाने गाई चारल्या; तोच ‘ गोपाळकृष्ण ’ पुढे सोन्याच्या द्वारकेचा येवढा मोठा राजा होणार; द्वारकाधीश होणार याची कुणास कल्पना तरी होती का प्रथम ?

—पण ते काही का असेना; बालवयात गाई चारणारा अन् गाईवासरांच्या पवित्र संस्कारात ‘ गुराखी ’ म्हणून वावरणारा हा बालक ‘ गोपीकृष्ण ’ वैभव शिखरावर विराजमान होऊन आज एक ‘ आदर्श धर्मनिष्ठ व दानवीर ’ म्हणून भारतात सुप्रसिद्ध झाला आहे खरा !

## भाग्यशाली रा. ब. गोवर्धनदास

बाळ गोपीकृष्ण जसजसा वाढू लागला, तसतशी त्याच्या शिक्षणाची काळजी त्याच्या वडिलांना लागली ! त्या काळी ‘ महाजनी पद्धती ’चे शिक्षण दिले जायचे. अर्थात् त्यानुसार बालवयातच ह्याही बालकावर धार्मिकतेचे संस्कार सुरू झाले ! आणि अशा रीतीने बाळ गोपीकृष्णावर योग्य शैक्षणिक संस्कार सुरू असतानाच वयाच्या आठव्या वर्षी त्यास स्व. रा. ब. गोवर्धनदास, तुमसर यांच्या दर्शनाचा योग घडून आला ! ‘ श्रीमान् रा. ब. गोवर्धनदासजी ’ आणि ‘ बाळ गोपीकृष्ण ’ ह्या पितापुत्रांची जोडी पूर्व-जन्मीच्या ‘ धर्म–कर्म–संस्काराने ’ झालेल्या ताटातुटीतून

अनेक जन्म भटकत भटकत ह्या जन्मी व्हावयाची होती, असेच म्हणावे लागेल ! कारण ज्याला व्यवहारात आपण 'आदर्श' म्हणून संबोधतो; अगदी तशाच प्रकारचा योग सेठजींच्या जीवनात श्री. गोपीकृष्णजींच्या 'पुत्रदान' (दत्तक) रूपाने घडून आला !

आणि अशा रीतीने संयमशील, कर्मरत, सदाचारी, मधुरवाणी, मितभाषी, सुहास्यवदनी अशी सोज्वळ नि मधुर अष्टवर्षीय 'बालमूर्ति' रावबहादूर सेठ गोवर्धनदासजी यांचे घरी प्रकटली !

## भाग्यवान बालक !

'पोटी-पाटी' पुत्र संतान नसल्यामुळे धर्मपरायण रा. ब. सेठ गोवर्धनदासजी हे स्वपत्नीसोबत एखादा दैवी पुत्र लाभावा म्हणून मुद्दामच नवलगढला आले होते. आणि शेवटी गोपीकृष्णांच्या मातोश्रीचे अनेक परीने सांत्वन केल्यानंतर तिने स्वतःचा हा बाळ रा. ब. गोवर्धनदास यांच्या पदरी सोपविला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ........................ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

# तुमसरात पदार्पण

विक्रम संवत १९७२ [स. १९१५] च्या काळात ह्या पुत्राचा नवा योग जुळून आल्यावर वयाच्या आठव्या वर्षी श्री. सेठ गोवर्धनदासजींनी त्यास स्वगृही आणले. त्यावेळी त्यांना हिंदी व गणित विषयाचे साधारण ज्ञान अवगत होते, पण कुशाग्र बुद्धिमत्ता व शिक्षणाची तळमळ यामुळे तुमसरच्या पाठशाळेंतील प्राथमिक शिक्षण अल्पावधीत पूर्ण करून विद्यार्थी गोपीकृष्णांनी मिड्ल स्कूलमध्ये प्रवेश केला. सेठजींच्या बाल्यावस्थेमध्ये तुमसरला त्याकाळी फक्त मिड्ल स्कूलच होते, आणि म्हणून तल्लख बुद्धीच्या ह्या बालकाचे शिक्षण फक्त मिड्ल स्कूलपर्यंतच होऊं शकले असले तरी त्यांचे निवासस्थानी मोठमोठे विद्वान् पंडित, संत महात्मे व समाजसेवक इ० ची नेहमीच वर्दळ प्रारंभापासूनच असल्यामुळे शालेय ज्ञानार्जनाबरोबरच, त्यांच्या अभिजात अशा धार्मिक जीवनाच्या दालनात धर्म नि संस्कृतीचे बाळकडू प्रवेशिले गेले.

## गृहसंस्कार

श्री. गोपीकृष्णांच्या शालेय जीवनातील 'सहप्रवासी' म्हणून श्री. मथुरादासजी दुबे* (उपमंत्री–मध्यप्रदेश)

---

* श्री. मथुरादासजी दुबे यांचे वडील तुमसर येथील पोलीस ठाण्यांत सबइन्स्पेक्टरच्या पदावर असल्यामुळे त्यांचे चि. मथुराप्रसाद दुबे यांचेशी शालेय वर्गबंधू ह्या नात्याने श्री. सेठ गोपीकृष्णजींशी संबंध आला.

श्री. सत्यनारायणजी अग्रवाल, श्री. तुलरामसिंह (इन्स्पेक्टर ऑफ पोलीस) आणि श्री. फुलचंदजी अग्रवाल यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. विद्यार्थी जीवनातच गोपीकृष्णजींनी धार्मिक प्रवृत्तीत रुची घेतलेली आढळते. धार्मिक उत्सवात सक्रिय सहयोग देणे; सण–समारंभात सार्वजनिक रीत्या भाग घेणे; सहयोगी गरीब अन् लाचार विद्यार्थी बांधवांना आर्थिक सहाय्य करणे हा त्यांचा चिरस्थायी स्वभावच! फार काय प्रस्तुत भाग्यवान पुत्र हा चारित्र्यसंपन्न व्हावा व शंभर टक्के धार्मिक संस्कार त्याच्यात बिंबावे म्हणून रा. ब. सेठ गोवर्धनदासजी बाल गोपीकृष्णास मोठमोठ्या यात्रांत नेत; त्या निमित्ताने महान् साधुसंत, योगी व पंडितांच्या गोड संगतीचा अलभ्य लाभ आणि त्यांच्या संस्कारांचा योग त्यांना अनायासेच घडायचा! परमेश्वराने त्याचा योग्य तो मोबदला त्यांना बरोबर दिला! आणि म्हणूनच धार्मिकतेचे सात्त्विक संस्कार त्यांच्यात ओतप्रोत बिंबले गेले ते कायमचेच!

## धार्मिकतेचे महान् पुजारी!

सेठ टोलुरामजी यांचे घरची इष्ट आराध्य देवता म्हणजे श्री. हनुमानजी! श्री. गोपीकृष्णजींची आजी ह्या बालकास रात्रीचे वेळीं ‘टपोर चांदण्या’च्या त्या शुभ्र प्रकाशात स्वत:चे जवळ घ्यायची व त्यास पौराणिक नि धार्मिक कथा कहाण्या सांगायची! रामायणातील इतर देवदेवतांच्या नि विशेषत: श्रीहनुमानजींच्या



श्री. सेठजींचे पितामह स्व. श्री. टोलूरामजी

चमत्कारिक दैवी लीला वर्णन ऐकता ऐकता गोपीकृष्णजींचे सात्विक बालमन भक्ति, श्रद्धा, सत्य, परोपकार, सत्कार्य–सेवा इ०त ओतप्रोत भरून यायचे ! ह्या उच्च संस्कारा-मुळेच श्रीहनुमानजींचे ते जसे नि:स्सीम उपासक बनले तसे त्यांचे प्रत्येक दिवशी इष्ट देवतांचे दर्शन व पूजन–अर्चन करण्याचे व्रतहि पण कायम राहिले ! आणि त्याचाच परिणाम म्हणजे राजस्थानमधील 'सालासर'* येथे ते आजहि दरवर्षीच नित्यनेमाने जात असतात.

—आणि म्हणूनच वर नमूद केलेल्या 'गृह' आणि 'धार्मिक' संस्कारांच्या बाळकडूमुळे श्री. गोपीकृष्णजी देवदेवतांचे, समाजाचे नि धर्माचे महान् पुजारी झाले असल्यास नवल ते काय ?

## व्यवसाय–कार्यात पदार्पण

मिड्ल स्कूलचे शिक्षण संपल्यावर गोपीकृष्ण-जींना घरगुती व्यावसायिक धंद्याचे शिक्षण देण्यात येऊ लागले. रावबहादूर आपल्या बालकास त्यासाठी दुकानात पाठवू लागले, व अल्पावकाशातच वहीखात्याचे ज्ञान,

---

* राजस्थान मधील 'सालासर' हे श्रीहनुमानजींचे सुप्रख्यात जागृत असे देवस्थान असून ह्या पवित्र जागृत स्थळाचे दर्शन घेण्याकरिता भारतातील सर्वदूरवरून भाविक यात्रेकरू नेहमीच तेथे येत असतात ! त्यामुळे त्यांच्या साऱ्या प्रापंचिक इच्छा परिपूर्ण होऊन, इच्छुक दर्शनार्थी भाविकांना सात्विक समाधान लाभत असते. एवढे ह्या 'सालासर' क्षेत्राचे माहात्म्य !

व्यापारी उलाढाली इ० बाबतीत गोपीकृष्णजींची कुशाग्र बुद्धी तळपायला लागली. दुकानातील मुरब्बी मुनिमांचा सहवास, रावबहादुरांचे यथोचित मार्गदर्शन यामुळे मुळातच काटकपणा व तळमळ अंगी असलेल्या गोपीकृष्णजीकडून व्यापार व्यवसायाच्या आवश्यक शिक्षणाची जबाबदारी पेलण्याची अपेक्षा घरची कर्तबगार मंडळी करू लागली असल्यास नवल ते काय ?

## ‘ शुभमंगल सावधान ! ’

श्री. गोपीकृष्णजींचा पहिला शुभविवाह इ. स. १९२४ मध्ये झाला. तुमसरचे सुविख्यात दानवीर व गोभक्त श्री. सेठ फत्तेचंदजी मोर यांची सुविद्य कन्या श्रीमती गुलाबबाई त्यांना देण्यात आली. पण आठ वर्षांनंतर पहिल्या कन्येला जन्म दिल्यावर ती अभागी धर्मपत्नी देवाघरी निघून गेली ! ही पहिली धर्मपत्नी मोठी चतुर, सुशील अन् सुसंस्कृत अशी ‘ आदर्श गृहलक्ष्मी ’ सेठजींना लाभली होती. पण परमेश्वराला ‘ लक्ष्मी–नारायणाचे ’ हे जोडपे दीर्घकाल कायम ठेवावयाचे नव्हते !

—आणि ह्याच कालखंडात श्री. सेठ गोपीकृष्णजींच्या जीवनाला धार्मिक संस्कारांची जोड मिळायला प्रारंभ झाला. सेठजींच्या आजीची धर्मभगिनी श्री. सरस्वती देवी ही त्यांच्याच वाड्यात असायची. देवपूजा व अनेक धर्मग्रंथांत त्या माऊलीचे प्रगाढ ज्ञान ! आणि तिनेच केवळ १२–१४ वर्षे वयाच्या ह्या गोपीकृष्णास पूजापाठ, विष्णु-

७७७२५ 1542 ...

सहस्रनाम इ. अनेक धार्मिक संस्कारांचे बाळकडू पाजून त्यांच्या कोवळ्या जीवनाची वेली धर्मसंस्काराच्या वृक्षाकडे वळविण्याचा श्रीगणेशा केला !

त्या काळात रायबहादुर सेठ गोवर्धनदासजींकडे देशातील अनेक पुण्यक्षेत्रांहून मोठमोठ्या विद्वान पंडितांची वर्दळ नेहमीच असायची. 'रायबहादुरां'च्या खाजगी बैठकीत साहजिकच ह्या थोर संत विद्वानांशी ते धार्मिक विषयाला अनुसरून नेहमीच चर्चा करायचे ! बाल गोपी-कृष्णाची सात्त्विक प्रवृत्तीहि अर्थातच त्या गप्पागोष्टी ऐकण्यात रंगून जायची—आणि अशा ह्या सत्संगामुळे त्यांना धर्मग्रंथपठण व पूजापाठाचे इतके वेड लागले की, त्यांनी अल्पावधीतच चाणक्य नीति; भर्तृहरी शतक, हितोपदेश व अनेक आयुर्वेदिक ग्रंथ इ० विविध ग्रंथ-पुराणांचे अनेकदा वाचन-मनन करून त्यांना त्यांनी जणु आपल्या जीवनाचे साथीच करून टाकले !

## आदर्श गृहलक्ष्मी !

पहिल्या धर्मपत्नीच्या मृत्यूमुळे जाणवत असलेली गृहसौख्याची त्रुटी भरून काढण्यासाठी श्री. गोपीकृष्णजींचा दुसरा विवाह सन १९३२ मध्ये पार पडला. शिवनीचे प्रतिष्ठित नागरिक श्रीमान् सेठ प्रभुदयालजी अग्रवाल यांची सुकन्या श्रीमती रूपकलाबाई ही त्यांची द्वितीय धर्मपत्नी ! सुदैवाने ही द्वितीय भार्या पण सेठजींना 'आदर्श' अशीच लाभली ! पति-परायणता; आतिथ्यशीलता;

दातृत्वाची आवड; इ० अनेक सद्‌गुणांची 'माऊली' सेठजींना धर्मपत्नी लाभल्यामुळे ती पुढे 'भाग्यलक्ष्मी' ठरली असल्यास नवल ते काय? कारण ह्या बाईपासूनच त्यांच्या कुटुंबात 'संतती' व 'संपत्ती' ची संयुक्त वेली वाढली नि फुललेली दिसून येते!

## धन्य सौ. रूपकलाबाई!

तसे पाहू गेल्यास ह्या 'राजारामका' वंशाचा गेल्या दोन पिढ्यांचा जर इतिहास चाळला तर, वंश-कुळाची वेली वाढीस लावण्याकरिता 'दत्तक पुत्रा'ची प्रथा ठेवणे आवश्यकच होत आले होते. पण भाग्यशाली सेठ गोपीकृष्णजी आणि सौ. रूपकलाबाईच्याच कारकीर्दीपासून ही प्रथा आपोआपच संपुष्टात आली असे दिसून येते—आणि म्हणूनच आज राजारामका कुटुंबाचा 'विशाल वटवृक्ष' हा संतती, संपत्ती, दानधर्म, समाजसेवा, राष्ट्रधर्म, उद्योगधंदे व विद्या इ० नी भरपूर विस्तारलेला नि बहरलेला झाला आहे!

तुमसरचे सुविख्यात धर्मपंडित श्रीमान् शिवदत्त शास्त्रीजी, विद्यालंकार व साहित्यरत्न यांनी पण सेठजींच्या आयुष्यातील विशिष्ट कालखंडात सेठजींना संध्या-नित्यकर्म, वेदग्रंथपठण इ० धार्मिक संस्कार दिले आहेत.

आणि अशा रीतीने सेठ गोपीकृष्णांना त्यांच्या बालवयापासून वर सांगितल्याप्रमाणे सरस्वतीदेवी; त्यांचे

पिताजी रायबहादुर सेठ गोवर्धनदासजी व त्यांचेकडे येणाऱ्या थोर थोर संतमहंतांचा सहवास, पंडित शिवदत्त शास्त्रीजींनी दिलेले धार्मिक संस्कार इ० मुळे सेठ गोपीकृष्णजींचे जात्याच मृदु व सात्विक असलेले अंतःकरण मोठे रसाळ, धर्मपूजक व पापभीरु बनले ते कायमचेच !

## आदर्श कुटुंब

परमेश्वर कृपेने त्यांच्या भाग्यशाली विशाल कुटुंबांत संपत्ती, सुसंतती आणि सुकीर्तीची ध्वजा उंच उंचच फडकत असलेली दिसून येते ! त्यांना सहा पुत्र व पाच कन्या आहेत. दोन मुली मोठ्या असून त्यांची लग्नकार्येही सुखवस्तू घराण्याशी झालेलीं आहेत. सेठजींच्या ह्या दोन्ही मुली संतती संपत्तीने 'भाग्यवान' अशाच असून रायसाहेबांचे जेष्ठ पुत्र श्री. रविशंकरजी यांचा विवाहसंबंध मुंबईचे सुप्रसिद्ध 'मुरारका' कुटुंबाशी घडून आला. त्यांची धर्मपत्नी श्रीमती सुनीलादेवी एक 'सुसंस्कृत' महिला ! थोरल्या चिरंजीवांच्या ह्या लग्नाप्रीत्यर्थ रा. सा. सेठ गोपीकृष्णजींनी अनेक सार्वजनिक संस्थांना मुक्तहस्ताने दानधर्म केला ! आणि नगरांतील प्रत्येक नागरिकांस मिठाई पण वाटली ! व अनेक संस्थांना विपुल प्रमाणांत दानधर्म नि देणग्या दिल्या ! सेठजींच्या ह्या स्तुत्य उपक्रमाचे मुंबईच्या अनेक संस्थांनी त्यावेळी अभिनंदनहि केले आहे !

सेठ रविशंकरजींनी बरीच वर्षे 'मानव' नावाचे मासिक स्वतःच्या संचालकत्वाखाली चालवून हिंदी

साहित्यात एक मौलिक भर टाकली. श्री. रविशंकरजींनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण करून ते आता मॅंगनीजच्या व्यवसायात कटाक्षाने लक्ष घालतात.

## ज्येष्ठ पुत्र श्रीमान् रविशंकरजींचे विदेश भ्रमण

अगदी थोड्या कालावधीमध्ये मॅंगनीजसारख्या, राष्ट्रप्रतिष्ठेशी संबंधित असलेल्या व्यापार व्यवसायांत हिरिरीने लक्ष घालून त्यांत त्यांनी 'एक कुशल व्यवसायी' म्हणून ख्याती प्राप्त केली आहे. एवढ्या लहान वयातहि त्यांनी अमेरिका, इंग्लंड, जपान, कॅनडा, झेकोस्लोवाकिया इत्यादि देशांत भ्रमण करून भारताचा हा गौरवशाली व्यवसाय वृद्धिंगत करण्यात मोलाची भर टाकली आहे. स्वतःच्या परदेशपर्यटनात श्री. रविशंकरजींनी अन्य अनेक उद्योगांचे अध्ययन केले आणि भारताची प्रतिष्ठा कोणत्या उद्योगापासून उंचावून ते स्वतःसहि हितावह होईल, याबाबतचा अभ्यास केला ! आणि स्वदेशी परतल्यावर भविष्य काळात तुमसर व आजूबाजूच्या क्षेत्रात मोठे कारखाने काढण्याचा त्यांचा मानस आहे !

सेठजींचे द्वितीय चिरंजीव श्री. कुंजबिहारीजी हे सुद्धा एक प्रतिभासंपन्न तरुण युवक आहेत. विद्यार्जनासोबतच ते सुद्धा वडिलोपार्जित चालत आलेल्या उद्योगव्यवसायात लक्ष देऊ लागले आहेत. कुमारवयातहि चतुराई, मोकळेपणा औदार्य व नम्रता हे गुण त्यांच्यात प्रकर्षाने दिसून येतात !

तृतीय पुत्र संतोषकुमार हे नॅशनल कॉलेजमधून बी. कॉम. ची पदवी प्राप्त करून 'एल्एल्. बी.'च्या पायरीवर उभे आहेत ! तसेच नागपूर येथील सी. एडलजी ह्या सुप्रसिद्ध कंपनीचाहि सारा व्याप सांभाळून तिचे कार्यसंचालन पण तेच करीत आहेत ! शिक्षणक्षेत्राप्रमाणेच त्यांना—बॅडमिंटन व अन्य खेळांचा भारीच छंद ! नम्रता हा त्यांच्या स्वभावाचा स्थायी गुण ! आणि म्हणूनच एवढ्या लहान वयातहि संतोषकुमार म्हणजे शेकडो युवकांचे एक मोठेच आकर्षण झाले आहे !

त्यानंतरचे सेठजींचे चिरंजीव महेशकुमार व प्रकाश-कुमार सुद्धा विद्यार्जनात 'कुशाग्र बुद्धी'चे म्हणून चमकताना दिसतात.

—आणि अशी ही सेठजींची सर्वच मुले त्यांच्या 'पावलावर पाऊल' टाकून ती सुद्धा भावी काळांत 'धर्मपरायण' व 'समाजसेवक' होतील, असा विश्वास बाळगू या.


# जनसेवेचा श्रीगणेशा

श्री. गोपीकृष्णजी आता स्वतःचे वडिलांचे हयातीतच स्वतःच्या पायावर उभे राहून 'दक्षतेने' जसा घरचा कारभार पाहू लागले, तसे सार्वजनिक कार्यातहि त्यांची कारकीर्द तळपू लागली ! आणि म्हणूनच स्वतः होऊन सरकारने त्यांना सन १९४३ सालीं

## 'रायसाहेब' ही मानाची पदवी

देऊन गौरविले ! त्या आधी गोपीकृष्णजी हे वडिलांचे देखरेखीखाली 'ऑनररी मॅजिस्ट्रेट' झाले होते. त्यांना प्रथम तिरोडा येथील तृतीय श्रेणीचे बेंच दिले जाऊन त्यानंतर तुमसर येथील द्वितीय श्रेणीच्या मॅजिस्ट्रेट पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

अशा रीतीने न्यायदानाची 'समाजसेवा' करण्याची संधी त्यांना प्रख्यात दानवीर स्व. सेठ श्रीरामजी सराफ, प्रसिद्ध मालगुजार स्व. माधवरावजी देशमुख पटेल आणि रायसाहेब सेठ घासीलालजी जैपुरिया यांचे सोबत एका बेंचावर मुकदमे ऐकतांना व त्यांचा निर्णय देण्याचे निमित्ताने अनेकदा आली होती. आणि कुणाचीहि भीड-मर्वत न ठेवता–पक्षातीत वृत्तीने–न्यायदेवतेला स्मरून आमच्या रायसाहेब सेठ गोपीकृष्णजींनी त्याकाळी अनेक मुकदम्यांचे निर्णय मोठ्या कुशलतेने हाताळले आहेत !



सेठ गोपीकिसनजींचे वडील व मातोश्री

अनु क्र (३३) ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

## व्यावसायिक कुशलता

सेठ गोपीकृष्णजी हे वडिलांचे एकुलते एक ‘ दत्तक ’ अपत्य ! घरीं ‘ लक्ष्मीचा वरदहस्त ’ ! पण अशाही परिस्थितीत ते एखाद्या ‘ ऐदी पुत्रा ’प्रमाणे स्वच्छंदी न बनता मोठे धार्मिक नि सात्विक स्वभावाचे निपजले; त्याचे वर्णन वर आलेच आहे !

खरोखरच, बाळपणापासून त्यांचे जीवन सरस, विनोदप्रिय, कलाप्रिय व चारित्र्यसंपन्न असे आहे. संवत १९९९ (चैत्र–शुद्ध अष्टमी, मार्च १९४२ इ.) मध्ये रा. ब. सेठ गोवर्धनदास यांचा मृत्यू झाल्यावर सर्व व्यापार–व्यवसायाची सूत्रे गोपीकृष्णजींनी सांभाळली खरी, पण ‘ कुलांगाराप्रमाणे ’ तिची उधळपट्टी न करता अनेक क्षेत्रांत त्यांनी स्वकर्तृत्वाचे जाळे विणले व अशा रीतीने ते भारतांतील व्यापारात विशेषत: ‘ मँगनीजव्यवसायाचे प्रमुख व्यापारी ’ व निर्यातकर्ते बनले.

आणि स्वत:च्या कुशल व्यवहाराला ‘ पापभीरुता ’, ‘ मृदु वाणी ’ व एकूण ‘ सात्विकते ’ची जोड देऊन स्वदेश व स्ववंश यांना साजेल अशाच पद्धतीने आमच्या रायसाहेब सेठजींनी व्यापार व अन्य उद्योग व्यवसाय केलेला आढळतो, असे मोठ्या गौरवाने म्हणावे लागेल !

## केवळ देशाच्या प्रतिष्ठेसाठी—

आज देशातील मोठमोठ्या धनपतींत त्यांची गणना केली जाते. व ‘ प्रामाणिक व्यवहार करणारे ’ म्हणून

त्यांचा लौकिक विदेशातही पसरला आहे ! फार काय, विदेशी बाजारपेठांत ‘ रायसाहेब सेठ गोपीकृष्णजी अग्रवाल ’ फर्मची भारी प्रतिष्ठा असून त्यांच्या फर्मशी परदेशातील व्यापारी कंपन्या मोठ्या आदरयुक्त दृष्टिकोनातून बघताना दिसतात !

तात्पर्य, माल, व्यवहार व मूल्यहि चोख अशा वरच्या स्तरातून, भारताची प्रतिष्ठा कायम ठेवूनच त्यांचा व्यापारविषयक व्यवहार होत असल्यामुळे अनेक विदेशी फर्मनी त्यांच्या ‘ आदर्श व्यवहारा ’ला प्रभावित होऊन आमच्या सेठजींच्या फर्मना उत्तमोत्तम प्रमाणपत्रे नि बक्षिसे बहाल करून गौरविले आहे !

## ‘ त्या संपत्तीचे ते एक ट्रस्टीच ’ !

धर्मवीर रायसाहेबांची अशा प्रकारची उदार व धार्मिक दानशीलतेची कीर्ती ऐकून भारतवर्षातील कोना-कोपऱ्यातून संतमहात्मे, सार्वजनिक संस्थांचे कार्यकर्ते, समाजसेवक, व राजकीय नेते यांची वर्दळ त्यांचेकडे नेहमीच असल्यास नवल ते काय ?

ह्या सर्व अतिथींचा सत्कार ते द्रव्यरूपाने आणि ‘ पुष्पं, फलं, तोयं ’ ने करतातच ! दारी आलेल्या गरजू जिवांना विन्मुख होऊन पाठविणे त्यांना मोठेच जड जाते ! अन्न, वस्त्र, दूध, फलाहार अन् योग्य द्रव्यदानाचे व्रत तर त्यांचे वाड्यात नेहमीच चाललेले आढळून येईल !

केवळ उगीचच तोंडभर स्तुती म्हणून नव्हे, तर सत्य सांगायचे म्हणजे गोपीकृष्णजी एक पुण्यशील व कर्तृत्ववान सत्पुरुष आहेत! त्यांचा असा ठाम विश्वास आहे की, "परमेश्वराने ज्यांचेजवळ विपुल प्रमाणात धनसंचय व ऐश्वर्य दिले आहे, त्यांनी आपल्या संपत्तीचा उपयोग सत्कार्यासाठी जरूर करावा. त्यातच त्यांच्या जीवनाचे खरे सार्थक आहे!"

आणि म. गांधीजींच्या शब्दात सांगायचे म्हणजे—"धनवान माणूस हा त्या संपत्तीचा एक ट्रस्टीच असतो." समाज व देशसेवा करण्यातच त्याची खरी सार्थकता असते! केवळ स्वतःच्या भोगासाठी नव्हे तर देशासाठी त्याची ही 'बांटो'—देण्याची वृत्ती आहे. त्यांच्या वडिलांचीही हीच वृत्ती! आणि ती आमच्या श्री. गोपीकृष्णसेठजींनी स्वतःच्या हयातीत प्रकर्षाने विस्तारलेली मात्र दिसून येते!

## अनेक सार्वजनिक संस्थांशी संबंध

रायसाहेब सेठ गोपीकृष्णजींमुळे अनेक सार्वजनिक संस्थांना प्रोत्साहन व चालना मिळालेलीही दिसून येते.

सन १९५३ मध्ये त्यांच्याच प्रेरणेमुळे, त्या काळातील मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री स्व. पं. रविशंकर शुक्ला यांच्या हस्ते उद्घाटनाने प्रारंभ झालेल्या नागपूर येथील प्रथम 'मध्यप्रदेश गोरक्षण' संमेलनाचे स्वागताध्यक्षपद रायसाहेबांनीच भूषविले होते. त्यानंतर सन १९५४ साली

तुमसर येथे पार पडलेल्या द्वितीय अधिवेशनातही ते 'कार्यकर्ता–स्वागताध्यक्ष' होते. आणि आजही ते 'विदर्भ प्रांतिक गोहत्त्या निरोध समिती'चे अध्यक्ष व 'विदर्भ क्षत्रीय गोशाळा पिंजरापोळ संघा'चे उपाध्यक्ष आहेत.

तसेच मागे नागपूरला पार पडलेल्या अ. भा. काँग्रेस अधिवेशनातील अ. भा. गोसंवर्धन सम्मेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. ह्या संमेलनाचे उद्‌घाटन मध्यप्रदेशाचे भूतपूर्व मुख्यमंत्री डॉ. कैलाशनाथ काटजू आणि अध्यक्षपद श्री. सेट गोविंददासजी (मध्यप्रदेश) यांनी भूषविले होते.

सन १९५४ मध्ये नागपूरला पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या 'भारत सेवक समाजा'च्या वार्षिक उत्सवाचे 'स्वागताध्यक्षपद' जसे रायसाहेबांना लाभले, तसेच 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'च्या ग्रीष्मकालीन 'संघशिक्षावर्गा'च्या (नागपूर ओ. टी. सी.) समारोप समारंभाचे अध्यक्षपदही पण त्यांनी एकदा भूषविले होते.

सन १९५५ मध्ये श्री. शिवशर्माजी यांचे अध्यक्षतेखाली नागपूरलाच भरलेल्या 'अखिल विदर्भ आयुर्वेदिक महासंमेलना'ची धुरा जशी त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली, त्याचप्रमाणे दरवर्षी येणारी 'अग्रवाल जयंती आणि प्रांतिक स्वरूपाची भिन्न भिन्न प्रकारे येणारी सार्वजनिक समारंभांची जबाबदारी पण त्यांचे वाट्यास हटकून यायचीच !

## 'श्रीहनुमान' ताल एक डौलदार आकर्षण !

स्वतःचे हातून सामाजिक कार्याचा श्रीगणेशा करण्यापूर्वी सेठ गोपीकृष्णजींनी वडिलोपार्जित चालत आलेल्या सार्वजनिक संस्थांचा कारभार प्रथम विस्तारित केलेला आढळतो. त्या संस्था त्यांनी अधिक क्रियाशील व समाजोपयोगी बनविल्या.

रायसाहेबांचे आजोबा स्व० सेठ टोलूरामजी यांनी तुमसरला बांधलेल्या धर्मशाळेचा पद्धतशीर विस्तार करून ती सर्वदृष्टचा सोयीची बनविली. वडिलांनी निर्माण केलेल्या 'श्रीहनुमान ताल' ह्या सर्वांगसुंदर तलावातही मुकी जनावरे व बायकांना सोईस्कर होईल, अशा रीतीने बऱ्याच सुधारणा करून त्याचा विस्तार केला. प्रस्तुत 'श्रीहनुमान ताल' म्हणजे तुमसरचे एक आकर्षण असून त्याच्या मध्यभागातील 'डौलदार' सुंदर बगिच्याची रचना, मध्यभागी प्रस्थापना केलेली (पिताजी) स्व० रा. ब. सेठ गोवर्धनदासजीची संगमरवरी प्रस्तराची पूर्णाकृती विशाल मूर्ती, अखंडपणे खेळत असलेले अथांग पाणी, एकीकडे माणसांना स्नानसंध्यादि नित्यकर्मे व जलक्रीडा करण्यासाठी बांधलेला पक्क्या पायऱ्यांचा व ओटयांचा घाट आणि दुसरीकडे मुक्या जनावरांची तृषा भागविण्यासाठी केलेली जलाशयाची सोय !

एकूण 'श्रीहनुमान तलावाची' सारीच व्यवस्था मोठी वैशिष्टयपूर्ण व नयनमनोहर अशी असून तुमसरचे

ते एक विलोभनीय असे आकर्षण ठरले गेले असल्यास नवल नाही !

## केवळ अभागी जीवांसाठी—

रायसाहेबांची धर्मपरायणता सर्वश्रुत आहे. त्यांचे निवासस्थानी देवाचे संकीर्तन, कथा-प्रवचने अखंड अशी तर होत असतातच, पण साधुसंत, ब्राह्मण आणि विद्वानांचा आदरसत्कार करणे हे तर त्यांचे दैनिक कार्यच होऊन बसले आहे. त्यांच्याच प्रयत्नाने तुमसर नगरात 'पंचायत-सदावर्ताची' स्थापना झालेली असून त्या द्वारे रोज अनेक अनाथ, अपंग आणि आपद्ग्रस्त जीवांना भोजनाची सामुग्री पुरविली जाते. वर्षातून असे दहा हजार अभागी जीवांना तरी संतोषिले जात असावे !

रायसाहेब साहित्य, संगीत आणि इतर ललित कलांचेही उपासक आहेत. त्यांचे येथे उच्च कोटीतील संगीतज्ञ आणि गायक नेहमीच येत असतात. होळीच्या मंगल पर्वकाळी (धुळवडीच्या दिवशी) सेठजी तर सर्वात मिसळून सामान्य जनाप्रमाणे होळी खेळण्यात रंगून जातात आणि होळीतील संगीताचीही ते रुची घेतात !

## शास्त्रानुसार व्यवहार

खरोखरच रायसाहेब सेठ गोपीकृष्णजींची एकूण दानशीलता, धार्मिकता बघून माणूस आश्चर्यचकित होऊन जातो ! एवढे मोठे उद्योगपती आणि व्यवसायी असूनही

ते भजनपूजन, धर्मचर्चा, आणि सत्संगात किती तरी वेळ घालवीत असतात. धर्माविषयी त्यांचे ज्ञान मोठे प्रखर असून त्यांचे प्रत्येक कार्य हे धर्मानुकूल आणि शास्त्रांच्या आज्ञेनुसार चालत असते !

तुमसर, भंडारा जिल्हा आणि विदर्भ–महाराष्ट्रच काय, पण काशी, गया, प्रयाग, रामेश्वर, जगन्नाथपुरी अशा भारतातील सर्वदूर पसरलेल्या मोठमोठ्या तीर्थ-स्थळीही रायसाहेबांनी अमाप दानधर्म केलेला आहे ! खरोखरच ते कर्णाप्रमाणे दानी आहेत. त्यांच्या दानधर्मा-मुळे आज अनेक शिक्षणसंस्था चालू असून नवीन मंदिरांची निर्मिती, प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, विद्वान ब्राह्मण, दीन, आर्त, अनाथ, विधवा महिला, यांना जसे त्यांचे भरीव आर्थिक सहाय्य लाभते, तसेच धर्मशाळा, औषधालये, पानघाट आणि ब्राह्मणांच्या निवासासाठी नवीन घरांची निर्मिती इ. कार्ये त्यांचे हातून प्रत्यही होत असतात आणि पुढेही चालू राहतील !

## भारतीय सभ्यतेचे उपासक !

स्वराज्यप्राप्तीनंतरही आज देशात सर्वत्र इंग्रजी वेषभूषा आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा बोलबाला दृष्टीस पडतो. लोक इंग्रजांची संस्कृती आणि सभ्यतेच्या बुरख्या-खाली केवळ गुलाम बनत चाललेले आहेत, पण हे त्यांना बिलकूल पसंत नाही. रायसाहेब भारतीय संस्कृती आणि सदाचार यांचे उपासक आहेत. या बाबतचे एकच उदाहरण

द्यावयाचे म्हणजे स्वतःच्या पुत्राच्या विवाहकार्यात त्यांनी कटाक्षाने लक्ष देऊन भारतीय संस्कृती व सभ्यतापूर्वक सर्व विधीकार्य पार पाडायला लावले आहे, आणि अलीकडे भोजन कार्यादि पद्धतीत अतिथींना टेबलावर अन्न वाढून ते खुर्च्यांवर बसून सेवन करण्याची जी पाश्चात्य पद्धतीची 'टूम' निघाली आहे, तिला झिटकारून त्यांनी हजारो स्त्रीपुरुष अतिथींना जमिनीवरच पात्रे मांडून भोजनाच्या कार्यक्रमाचा सारा थाट देशी पद्धतीने नि सात्त्विक वातावरणात उरकला !

---



नागपूर येथील ६४ व्या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रसंगी स्वागताध्यक्ष श्रीमती ताई कन्नमवार, श्री. यशवंतराव चव्हाण वगैरे काँग्रेसच्या नेत्यांसमवेत रा. सा. सेठ गोपीकृष्णजी

# त्यांचे व्यक्तिमत्व !

सेठजींच्या जीवनाचे सार काढले असता असे म्हणावे लागेल की, ते दानवीरात 'आदर्श दानवीर', सदाचारी व्यक्तीत 'आदर्श सदाचारी', भक्तांमध्ये 'परम-भक्त', भारतीय संस्कृतीचे अनुयायी, धर्मपालनात 'धर्म मर्यादेचे संरक्षक', गोब्राह्मणांचे 'अनन्य भक्त' आणि प्रेम व परोपकाराची 'सोज्वळ मूर्ती' आहेत !

तसे पाहू गेल्यास कुणास धनसंपत्तीचा अभिमान असतो, कुणास बुद्धीचे अजीर्ण होते, तर कुणाला स्वतःच्या शक्तीचा 'मद' चढतो ! परंतु आपल्या चरित्रनायकास 'अभिमान' आहे तो धर्माचा; 'कामना' आहे ती सुयशाची आणि 'अतिरेक' आहे तो उदारतेचा ! त्यांच्यात सत्तालोलुपता नाही, परंतु सत्कार्य करण्याची जन्मजात 'खोड' मात्र आहे ! से पंडित नाहीत, पण सत्संग, सु-श्रवण आणि निरंतर मनन यामुळे त्यांच्यात वास करीत असलेले ज्ञानभांडार कधी कधी चांगल्या-चांगल्यांची मती गुंग करून सोडते ! सेठजी गुणांचे रसिक आहेत, पण पांडित्याचे प्रदर्शक नाहीत ! 'आदरातिथ्य' करण्यात तर ते 'सजीव मूर्ती' आहेत ! व्यापार-व्यवसाय-क्षेत्रात स्पर्धा, द्वेष आणि झगड्यांचे प्रसंग अनिवार्यच असतात, परंतु रायसाहेबांनी त्यांच्यात उपजत असलेले सौजन्य, समजूतदारपणा आणि मृदु भाषण यांमुळे अनेक

अप्रिय प्रसंगांना कुशलतापूर्वक टाळलेले आहे. आणि विशेषेकरून परदेशातही याच कारणामुळे त्यांच्या फर्मची कदर व किमत आहे !

रायसाहेब नास्तिकांना 'आस्तिक' शत्रूंना 'मित्र' व निंदकांना 'प्रसंशक' आहेत ! खरोखर त्यांच्या आकर्षक क्षेत्रात एक वेळ आलेली व्यक्ती ही सदैव त्यांचीच होऊन जाते. आजकाल जास्त 'धनसंग्राहक' होणे हेही एक पापच आहे, आणि सज्जन होणेही एक दोषच आहे ! आणि ह्याच पाप आणि दोषाचे कारणामुळे जेव्हा आपल्या सेठजींना संत्रस्त होण्याचे प्रसंग येतात, तेव्हा त्यांच्यातील अभिजात असलेली मौलिक 'आस्तिकता' जागी होते आणि ही सर्व 'भगवंताचीच इच्छा' या दृढभावनेमुळे स्वत:वरची गंडांतरे दूर करण्यात त्यांनी विजय प्राप्त केला आहे !

## अफाट जनसेवेचे ओझरते दर्शन !

आतापर्यंतच्या विवेचनावरून रा. सा. सेठ गोपीकिसनजी यांच्या सेवाकार्याची आपणास ओळख झालीच असेल. त्यांचा पिंडच मुळी परोपकारी ! सेठजींनी स्वत:च्या अर्ध आयुष्यात देशाच्या आणि समाजाच्या विविध क्षेत्राच्या दालनात किती पैसा ओतला त्याची गणती तरी करायची कशी ? त्यांच्या वाड्यात जाऊन पहा तुम्ही, आणि थोडे अवलोकन करा. सुमारे २–३ शेचा दानधर्म रोज चालत असलेला दिसून येईल !

—आणि म्हणूनच आमच्या दयाळू सेठजींचा दृष्टि-कोन लक्षात घेता, त्यांना आवडत नसताही केवळ वाचकांना अंशत: कल्पना यावी म्हणून देशभर केलेल्या त्यांच्या सार्वजनिक कार्याचा—मी उल्लेख करीत आहे.

धर्मवीर रायसाहेबांनी 'व्रजभूमी श्रीगोवर्धन' मध्ये एक विशाल राजमहाल विकत घेऊन त्याचे रूपांतर धर्म-शाळेत केले आहे. विदर्भातील सुप्रसिद्ध तीर्थस्थान श्रीक्षेत्र रामटेक येथे त्यांची एक धर्मशाळा तयार होत असून त्यांनी चित्रकूट आणि प्रयाग येथील धर्मशाळांचीही दुरुस्ती केलेली आहे. नागपूरच्या प्रख्यात आणि विशाल अशा 'मोर-हिंदी' भवनाच्या इमारतीसाठी रायसाहेबांनी बरीच रकम सार्थकी लावली असून, विशाखापट्टम येथील जनसेवी संस्था 'प्रेम समाजम्' साठी त्यांनी एका सुंदर-खंडाची निर्मिती केलेली आहे. आणि श्री. गोपीकृष्णजींच्याच विशेष आर्थिक योगदानामुळे कामठी येथील 'अग्रवाल भवन' सारखी इतर अनेक भवने निर्माण करण्यात त्यांचा फार मोठा हिस्सा आहे! फार काय नागपूरला त्यांच्याच भरघोस आर्थिक पाठिंब्यामुळे अगदी नव्या अशा डौलदार स्वरूपात 'अग्रवाल भवनाची' इमारत नजीकच्या भविष्य काळात बघायला मिळेल, यात शंका नाही!

श्री. सेठ गोपीकृष्णजींनी, स्वत:च्या पिताजींच्या 'पुण्यस्मरणार्थ' भंडारा, तुमसर, कामठी येथील सरकारी इस्पितळांतील रोग्यांच्या सेवाशुश्रूषेसाठी मोठमोठे वार्ड बांधून दिले असून नागपूरच्या मेओ इस्पितळामध्येही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
क्रमांक



मातोश्रीच्या 'पावन–स्मृती' प्रीत्यर्थ एका मोठ्या वार्डाची निर्मिती करून दिली आहे.

तसेच भंडारा येथील 'महिला विभागा'साठी एका विस्तीर्ण इमारतीची निर्मिती, रामपायली, बालाघाट व भंडारा येथील इस्पितळांमधील सूतिकागृहे; गोबरवाहीच्या संपूर्ण इस्पितळाची इमारत, कामठीच्या इस्पितळामधील वार्ड व सूतिकागृह, तुमसरच्या लोकमान्य टिळक विद्यालयातील भव्य प्रार्थनाभवन, मिरगपूर (मँगनीज खाण) मधील माध्यमिक शाळेची भव्य इमारत, खास तुमसर नगरातील हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी व लाखो रुपये खर्चून बांधलेली हिंदी विद्यालयाची डौलदार व विशाल इमारत (पुढमागे हेच विद्यालय 'महाविद्यालया'त पदार्पण करील असे वाटते), तुमसरचे दातव्य औषधालय, नवलगढ व मथुरा येथील गोशाळा अशी कितीतरी सार्वजनिक हिताची भरीव कार्ये सेठजींनी करून ठेवलेली असून त्यांची सविस्तर यादी देणे म्हणजे एक स्वतंत्र ग्रंथच निर्माण करणे होईल!

रायसाहेबांनी गांधी स्मारक निधी, भारतसेवक समाज, गो–संवर्धन संस्था व अनेक विद्याव्यासंगी संस्थांना मुक्त कंठाने दानधर्म केलेला असून देशातील अनेक ठिकाणचे शाळा–कॉलेजातील होतकरू पण गरीब विद्यार्थी ह्या दानवीराकडून शिष्यवृत्या संपादून विद्यार्जन करीत आहेत.

संशोधिलेले आयुर्वेदविज्ञान हेच आपल्या भारतवासियांच्या शरीरप्रकृतीस चिरकाल मानवणारे असे

साधन आहे व त्यात निदश केलेले उपचारच आपणास तारक असून ते पाश्चिमात्य व अन्य विदेशी औषधांपेक्षा केव्हाही श्रेष्ठ प्रतीचे आहेत, असे ते नेहमीच सांगतात.

—आणि केवळ 'सांगतात' म्हणून नव्हे, तर 'आधी केले मग सांगितले' ह्या उक्तीनुसार या आयुर्वेदिक विज्ञानाचा देशभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनी अनेक वेळा आयोजित झालेल्या देशातील अनेक मोठमोठ्या कुंभ मेळ्यांतून धर्मार्थ आयुर्वेदिक मोफत चिकित्सालये उघडून त्यांतून हजारो रुपयांचा खर्च करून ह्या कार्याला उत्तेजनही दिले आहे.

रा. सा. सेठजींपुरते बोलायचे झाल्यास खात्रीपूर्वक रीत्या असे म्हणता येईल की, ते स्वतः आयुर्वेदिक औषधोपचारच घेत असतात. परदेशातून येणाऱ्या नि गावागावांतूनही अलीकडे धुमधडाक्याने खपणाऱ्या कसल्याही प्रकारच्या औषधांच्या बाटल्या वा इंजक्शने यांना त्यांनी कधीही स्पर्श केला नाही ! स्वतःच्या प्रकृतीस अत्यावश्यक भासणाऱ्या विशुद्ध आयुर्वेदिक औषधांचेही ज्ञान त्यांना अवगत असून ते त्यांचाच उपचार वेळप्रसंगी करीत असले तरी त्यापेक्षाही निसर्गोपचारालाच प्रामुख्याने प्राधान्यता देत असतात !

## आणि ते त्यांचे धर्मार्थ 'दातव्य' औषधालय

ग्रामीण, नागरीक किंवा कुठल्याही पीडित जीवांना आयुर्वेदिक पद्धतीच्या उपचाराचा लाभ व्हावा म्हणून

खास तुमसर नगरात त्यांनी सन १९५३ मध्ये ‘ दातव्य औषधालय ’ सुरू केले असून त्याद्वारे स्त्रीपुरुष व बालकांच्या अनेक रोगांची विशुद्ध आयुर्वेदिक पद्धतीने चिकित्सा केली जात असते. गेल्या १२ वर्षांत ह्या लोकप्रिय चिकित्सालयाने खेड्यातील लाखो लोकांवर चिकित्सा केली असून त्यातून बहुतांश रोगी खडखडीत बरे झाले आहेत !

आणि अशा या प्रतिथयश चिकित्सालयावर ‘ मुख्य चिकित्सक ’ म्हणून श्रीमान वैद्यराज विश्वनाथजी जोशी, आयुर्वेदाचार्य, हे निष्णात वैद्य सेवाकार्य करीत असून त्यांच्या मनमिळाऊ व नम्र स्वभावाला अचूक ‘ निदानाची’ जोड मिळाल्यामुळे रायसाहेबांच्या या धर्मार्थ चिकित्सालयाला आज तुमसर परिसरात एक मानाचे नि प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे !

## केवळ लोकाग्रहास्तव—

नाही तरी आजही—‘स्वत:चा स्वार्थ साधावा व स्वत:ची प्रतिष्ठा उंचावी ’ म्हणून ‘ समाजसेवेचा पोकळ मुखवटा ’ चढवून लोककल्याणाच्या गप्पा मारणारे महाभाग समाजात काय कमी आहेत ?

पण इतके असूनही सेठजींना ‘ लोकसभा ’ व ‘ विधानसभे ’च्या पदासाठी उभे राहण्याविषयी अनेकदा आग्रह झाला असला तरी, आणि सर्व परिस्थिती अनुकूल असताही त्यांनी साभारपूर्वक नकारच दिला आहे.

आणि नाहीपेक्षा केवळ तुमसर नागरिकांच्या आग्रहास्तव त्यांनी सन १९५८ मध्ये नगरपालिकेच्या निवडणुकीत भाग घेतला व भरघोस मताधिक्याने ते तुमसर न. पा. चे नगराध्यक्षही निवडून आलेत.

पण मुळातच निवडणुकी, पद वा राजकीय आखाड्याची लालमाती अंगी न लागलेल्या आमच्या रायसाहेबांना हा नगराध्यक्षपदाचा बहुमान चालून आला असला, तरी स्वतःच्या पापभीरु व सौजन्यशील वागणुकीने ते यातही तन्मयतेने लक्ष घालीत असल्याचेच दिसून आले.

# ५१ वा वर्धापन दिन समारंभ

अशा ह्या समाजसेवक सेठजींचा यथोचित रीत्या गौरव व्हावा, म्हणून त्यांच्या काही चहात्या मित्रमंडळी-कडून सेठजींच्या ५१ व्या वाढदिवसाचे निमित्ताने एक मोठा सत्कार समारंभ आयोजित करण्याचे ठरले व दिनांक २८ फेब्रुवारी १९६० रोजी त्यांचा ५१ वा वर्धापन दिन मोठ्या थाटात पार पडला !

नियोजित समारंभ हा त्यांच्या ५२ व्या वर्षी पार पडला असला, तरी त्या आधी दोन वर्षांपूर्वीच, तुमसरातील एक सुप्रसिद्ध दानवीर श्री. सेठ नरसिंगदासजी मोर यांचे अध्यक्षतेखाली 'श्रीराजारामका अभिनन्दन समिती' निर्माण केली गेली व त्या समितीत भारत वर्षातील मोठमोठे पंडित नि धर्मशास्त्रवेत्ते घेण्यात आले होते. ह्या समितीद्वारे सेठजींचा जीवनपरिचय दिग्दर्शित करणारा असा सुमारे ५०० पृष्ठांचा विशाल 'अभिनंदन ग्रंथही' तयार करण्यात येऊन तो रायसाहेबांना अर्पण करण्यात आला !

## 'श्री राजारामका अभिनंदन ग्रंथा'चे संपादक मंडळ

'अभिनंदन ग्रंथ निर्मिती'साठी जे संपादक मंडळ स्थापन करण्यात आले, त्यात खालील विद्वानांचा समावेश करण्यात आला होता—

(१) श्री. पं. शिवदत्तजी शास्त्री, विद्यालंकार, साहित्यरत्न,



उज्जैन येथील कुंभमेळयात सेठ गोपीकृष्णजींनी उघडलेल्या
धर्मार्थ आयुर्वेदिक औषधालयाचे एक दृश्य.

(२) श्री. सत्यदेव विद्यालंकार,
(३) श्री. शिवनारायणजी अग्रवाल,
(४) श्री. विश्वनाथजी जोशी, आयुर्वेदाचार्य,
(५) श्री. भवानीशंकर शर्मा,
(६) श्री. चंदूलाल चोटिया,
(७) श्री. पुसूलालजी अग्रवाल
(८) श्री. विश्वंभरप्रसाद शर्मा—संयोजक.

रायसाहेब सेठ गोपीकृष्णजी अग्रवाल यांच्या ५१ व्या वाढदिवसाचे निमित्ताने, त्यांना जो विशाल अभिनंदन ग्रंथ अर्पण करण्यात आला, व त्याप्रित्यर्थ देशातील थोर विद्वानांकडून जो प्रकट असा सत्कार समारंभ पार पडला, तो अपूर्व प्रसंग म्हणजे सेठजींच्या जीवनातील महत्वाचे असे एक सोनेरी पानच होय !

## आणि तो भव्य सत्कार समारंभ !

सेठजींचा ५१ वा वाढदिवस दिनांक २० फेब्रुवारी सन १९५८ (फाल्गुन शुक्ल द्वितीया) रोजी मोठ्या डामडौलात पार पाडण्यात आला. त्या दिवशी प्रात:काळीं व ९ ते १२ वाजेपर्यंत सेठ गोपीकृष्णजींनी स्वत:च्या धर्मपत्नीसोबत होम, हवन, पूजन, इत्यादि धार्मिक विधी पार पाडल्यावर ब्राह्मणांनी रायसाहेबांना वेदमंत्रांनी शुभाशीर्वाद दिला व त्यांचे अभिनंदन केले ! ह्या प्रसंगी सेठजींनी ब्राह्मणांना अन्न, वस्त्र, गाई व सुवर्णाचे यथोचित दान केले. हा धार्मिक विधी सफल करण्याकरिता काशीचे

प्रसिद्ध याज्ञिक सम्राट पंडित श्री. वेणीरामजी शर्मा गौड-वेदांचार्य, नवलगढचे पं. ईश्वरदत्तजी त्रिवेदी व पं. रुद्र-दत्तजी चतुर्वेदी इ. नी जसा तन्मयतेने भाग घेतला, तसेच तुमसरचे विद्वान पं. शिवदत्तजी शास्त्री, विद्यालंकार आणि अन्य विद्वानांनी 'राजारामका भवना'त प्रत्यक्षत: उप-स्थित राहून सेठजींना शुभाशीर्वाद दिला !

सेठजींचा हा सत्कार समारंभ अविभक्त मध्यप्रदे-शाचे भूतपूर्व आणि वर्तमान मध्यप्रदेशाचे विधान सभाध्यक्ष श्री. कुंजीलालजी दुबे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

प्रथम मंगलाचरण व स्वस्तिवाचन, त्यानंतर स्वागतगीत आणि सत्कार समारंभाचे संयोजक पं. विश्वं-भरप्रसाद शर्मा यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर सेठजींना विधिपूर्वक 'श्री राजारामका अभिनंदन ग्रंथ' अर्पण करण्यात आला. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. नरसिंगदासजी मोर यांचे स्वागतपर भाषण झाल्यावर संयोजक श्री. विश्वंभरप्रसाद शर्मा यांनी

## थोरांचे शुभेच्छा संदेश

वाचून दाखविले. भारत वर्षातून आलेल्या ह्या शुभेच्छा संदेशांत जगद्गुरु श्री. निम्बार्काचार्य महाराज; प. पू. श्री. गोळवलकर गुरुजी, नागपूर; राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज, गुरुकुंज, मोझरी; महन्त लक्ष्मीनारायणदासजी, रायपूर; श्रीमती ताई कन्नमवार, नागपूर; श्री. सेठ गोविंददासजी, एम. पी., जबलपूर; श्री. मथुराप्रसादजी दुबे

९५२८

उपमंत्री, मध्यप्रदेश, जबलपूर; श्री. हनुमानप्रसाद पोद्दार, गोरखपूर; श्री. हिरालालजी शास्त्री, जयपूर (भूतपूर्व मुख्यमंत्री राजस्थान); श्री. सेठ किरोडीमलजी, रायगड; श्री. सेठ पालूरामजी धनानिया, रायगड; श्री. बलदेवजी आचार्य, दिल्ली; श्री. ब्रिजलालजी बियाणी, अकोला; श्री. दामोदरलालजी जैपुरिया, मुंबई; श्री. गोपालदासजी मोहता, हिंगणघाट; डॉ. शालिग्रामजी दीक्षित, एम. एल. ए., तिरोडा इ. चे संदेश उल्लेखनीय आहेत.

## आणि विद्वानांचे आशीर्वाद !

त्याचप्रमाणे ह्या शुभप्रसंगी देशातील अनेक संत-महात्मे आणि विद्वान मंडळींचे आगमन रायसाहेबांना आशीर्वाद देण्याकरिता झाले होते. मंडल्याचे वयोवृद्ध महात्मा श्री. सीतारामदासजी, स्वामी दामोदरलालजी महाराज, सुप्रसिद्ध विद्वान ज्योतिषी पं. शिवकुमारजी शास्त्री, कामठी, पं. शिवदत्तजी शास्त्री विद्यालंकार, तुमसर, व्याकरण साहित्य न्यायाचार्य पं. सूर्यकांत झा, नागपूर, पं. विश्वनाथजी जोशी, आयुर्वेदाचार्य, तुमसर, काशीचे प्रसिद्ध विद्वान पं. नित्यानंदजी त्रिपाठी, पं. मुरलीधरजी हिसारिया, तुमसर, काशीनिवासी प्रख्यात याज्ञिक-सम्राट पं. वेणीरामजी शर्मा, गौड वेदाचार्य, चित्रकूट-निवासी विद्वान पं. रामरूपजी, नवलगढचे प्रसिद्ध ज्योतिषी पं. ईश्वरदत्तजी शर्मा (ज्योतिषी), विदर्भातील प्रसिद्ध महिला सेविका श्रीमती राधादेवी गोइनका, जबलपूरचे

प्रसिद्ध ज्योतिषी विद्वान पं. नाथूरामजी व्यास, प्रयाग-निवासी महन्त श्री. वेणीदासजी स्वामी, गोंदियाचे श्री. लक्ष्मीनारायणजी आणि श्री. कन्हैयालालजी शर्मा, तुमसर इ. अनेक विद्वानांनी या प्रसंगी सेठजींना शुभाशीर्वाद देऊन त्यांच्या राष्ट्र, धर्म व समाजकार्याचा गुणगौरव केला! ह्या प्रसंगी तुमसर, विदर्भ व अन्य प्रदेशातून मुद्दाम आलेल्या सुमारे शंभरांवर व्यक्ती व संस्थांतर्फे सेठजींना पुष्पहार घालून त्यांनी आपली श्रद्धा व प्रेम व्यक्त केले.

## 'धर्मभूषण' पदवी!

रायसाहेबांच्या ह्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त घडलेली एक महत्वाची घटना म्हणजे त्यांना प्राप्त झालेली 'धर्मभूषण' ही मानाची पदवी! काशीच्या विद्वान पंडितांनी स्वतःच्या विशुद्ध भारतीय अशा 'वैदिक कर्मकांड मंडळ-काशी' ह्या संस्थेतर्फे रायसाहेब सेठ गोपीकृष्णजींना, त्यांची धर्मपरायणता, दानशीलता आणि जनसेवेचे महत्त्व लक्षात घेऊन ह्या प्रसंगी 'धर्मभूषण' ही बहुमानाची पदवी देऊन गौरविले! आणि असा हा श्रेष्ठ पदवीदान समारंभ काशीच्या विद्वानांचे वतीने वेदाचार्य पं. श्री. वेणीरामजी गौड यांचे हस्ते मोठ्या थाटात नि सात्विक वातावरणात पार पडला.

## अभिनंदनपर पत्रांचा वर्षाव!

आणि ह्याच प्रसंगी सुमारे पन्नास सार्वजनिक संस्थांचे वतीने 'धर्मभूषण' रायसाहेबांना अभिनंदन पत्रे व मानपत्रे

अर्पण करण्यात आली. त्यातील काही प्रमुख संस्था व पदाधिकाऱ्यांची नावे अशी —

( १ ) नगरपालिका तुमसर–नगराध्यक्ष श्री. नारायणराव कारेमोरे.

( २ ) श्रीकृष्ण गोशाळा तुमसर–मंत्री श्री. टेकचंदजी अग्रवाल.

( ३ ) धान्य व्यापारी संघ तुमसर–अध्यक्ष श्री. नरसिंगदासजी छीतरका.

( ४ ) मारवाडी–पंचायत सदावर्त तुमसर–श्री. घनश्यामदासजी खंडेवाल.

( ५ ) राजस्थानी सेवा संघ, तुमसर.

( ६ ) मंडल काँग्रेस कमेटी, तुमसर; अध्यक्ष–श्री. वासुदेवराव कोंडेवार.

( ७ ) टिळक राष्ट्रीय विद्यालय तुमसर–श्री. माकडे गुरुजी; एम्. एल्. ए.

( ८ ) नगर वैद्य सभा, तुमसर–पं. गोवर्धनजी शर्मा.

( ९ ) सार्वजनिक श्रीदुर्गाउत्सव समिती–कार्यवाह श्री. पाहूणे गुरुजी.

(१०) अग्रवाल जातीय सेवा संघ तुमसर—श्री. रा. सा. सेठ घासीलालजी जैपुरिया.

(११) हिंदी शिक्षा समिती तुमसर–श्री. सेठ रामनारायणजी मोर.

(१२) रा. सा. श्री. गोपीकिसन, हिंदी विद्यालय तुमसर–मुख्याध्यापक श्री. रामप्रसादजी शकरज्ञान.

(१३) श्री. ज्ञानेश्वर मंदिर, तुमसर.

(१४) न. पा. प्राथमिक शिक्षक संघ, तुमसर–कार्यवाह–श्री. मा. मु. आकरे गुरुजी.

(१५) नगर पत्रकार संघ, तुमसर–श्री. कृ. ल. निर्वाण गुरुजी.

(१६) जैनसमाज, तुमसर–श्री. प्रेमलालजी जैन.

(१७) रा. सा. सेठ गोवर्धनदास गोपीकिसन दातव्य आयुर्वेदिक औषधालय, तुमसर–प्रधान चिकित्सक–श्री. आयुर्वेदाचार्य पं. विश्वनाथजी जोशी.

(१८) रा. सा. सेठ गोपीकिसनजी फर्मच्या प्रतिष्ठित स्टाफतर्फे श्री. शिवनारायणजी अग्रवाल.

(१९) हिंदी साहित्य समिती, राजनांदगाव–श्री. नंदलाल चोटीया.

(२०) विदर्भ क्षत्रीय गोशाळा पिंजरापोळ संघ, नागपूर. श्री. सेठ दुर्गाप्रसादजी सराफ.

(२१) गोरक्षण सभा, नागपूर–पं. विश्वम्भरप्रसाद शर्मा.

(२२) आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर–प्राचार्य पं. शिवकरण शर्मा छांगाणी, आयुर्वेदाचार्य.

(२३) श्री. रामायणप्रसाद, राजनांदगाव.

(२४) राजस्थानी सेवा संघ, नागपूर–श्री. विश्वंभरप्रसादजी अग्रवाल.

(२५) नागपूर नगर काँग्रेस कमेटी–श्री. भोलासिंह नाईक.

(२६) वैदिक कर्मकांड मंडळ, काशी–पं. श्री. वेणीराम शर्मा, गौडवेदाचार्य.

(२७) सरस्वती पंचांग कार्यालय, नवलगढ–पं. ईश्वर-
दत्तजी शर्मा.

(२८) श्रीराम शिक्षा समिती, रामपायली–महंत श्री.
जोधादासजी इत्यादी.

याव्यतिरिक्त ज्या अनेक व्यक्तींनी सेठजींना अभिनंदन पत्रे पाठवून व पद्यरचना करून आपली आदरांजली अर्पण केली त्यात—

श्री. रघुनाथप्रसाहजी शर्मा, राष्ट्रकवी, गोंदिया.

पं. यमुनाप्रसाद शर्मा, वैद्य शास्त्री, मुंबई.

महामहोपाध्याय पं. श्रीधरअण्णा शास्त्री वारे, नाशिक.

पं. सूर्यदेवजी शर्मा.

पं. मुरलीधरजी, कामठी.

पं. कन्हैयालालजी शर्मा, गोंदिया.

श्री. चतुर्भुजजी अग्रवाल, गोंदिया.

श्री. बजरंगलाल पारिख (प्रसिद्ध कवि), राजस्थान.

श्री. शिवनारायणजी अग्रवाल.

श्री. उमाशंकरजी शुक्ल, संचालक–हिंदी साहित्य उत्थान ग्रंथमाला, रायपुर.

इ. अनेक सज्जनांची नावे उल्लेखनीय आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि:
नों: वि:

# रायसाहेबांचे मौलिक विचार

## ‘ गोरक्षण ’ आणि त्याचे राष्ट्रीय महत्त्व

गाय ही नेहमीच आपले राष्ट्र, धर्म व संस्कृतीचा आधार रहात गेली आहे. जर आपल्या भारतात ‘ गाय ’ हा प्राणी अस्तित्वातच नसला, तर आपण आणि आपले राष्ट्रही जिवंत राहू शकणार नाही, असे नक्की समजावे, व म्हणूनच आपल्या धर्मशास्त्रात गाईला पूज्यस्थान प्राप्त झाले आहे. आपल्या पुराणात तर गोमातेच्या पाठीत–ब्रह्मा, गळ्यात–विष्णु, तोंडात–रुद्र, आतील अवयवात–सर्व देवता, रोमकूपात–महर्षिगण, शेपटीत–अनंत नाग, खुरात–सर्व पर्वत, मूत्रात–गंगा इ. नद्या आणि तिच्या डोळ्यात चंद्र–सूर्य इ. पवित्र श्रद्धास्थानांची स्थापना करून गाईला पूजास्थानात सर्वात उंच अशा आसनावर विराजमान केले आहे !

—आणि म्हणूनच गाईचे रक्षण करणे म्हणजे आपले राष्ट्र, धर्म, संस्कृती अन् आपल्या सर्वस्वाचेच रक्षण करणे होय ! स्वार्थ व परमार्थ ह्या दोन्ही दृष्टीने गाईचे रक्षण, सेवा व तिचे पोषण करणे हा श्रेष्ठ असा धर्मच होय !



धनुष्कोटी येथे समुद्रस्नानाचे वेळी ब्राह्मणांस दक्षिणा देते वेळी
सेठ गोपीकृष्णजी व त्यांच्या धर्मपत्नी

ठाणे.

## 'शाब्दिक भक्ती'पेक्षा आता कृतीच हवी !

पण गोरक्षण व तिच्या संवर्धनाचे हे पवित्र कार्य, सरकार आणि जनता यांच्या परस्पर अशा सहकार्यानेच सफल होऊ शकेल.

म. गांधी, आचार्य विनोबा, पू. गोळवलकर गुरुजी यांच्या शब्दात सांगायचे म्हणजे 'गाय ही आपल्या कुटुंबाचे एक अंग बनली पाहिजे.' तरच तिचे रक्षण, पालनपोषण व संवर्धन होऊ शकेल. व्यक्तिशः गोपालनाशिवाय गोवंशाचे रक्षण आणि तिची उन्नति होणे संभवनीय नाही. म्हणून प्रत्येक कुटुंबात एक तरी गाय असलीच पाहिजे.

गाईविषयी आजपर्यंत आपली शाब्दिक भक्ति पुरे झाली, परंतु आता मात्र त्या भक्तीला आपण सक्रिय केले पाहिजे. कारण त्यामुळेच आपले व देशाचे कल्याण होऊन गोमाताही सुखी व संतुष्ट राहील, हे खास !

* * *

## धर्माचरणानेच राष्ट्र व समाजाचे कल्याण !

रा. सा. सेठ गोपीकिसनजीशी जेव्हा धर्म व संस्कृतीच्या बाबतीत चर्चा करण्याचा प्रसंग येतो, तेव्हा ते मोठ्या अभिमानाने म्हणतात की, "आपला देश नेहमीच धर्म व संस्कृतीच्या अभिमानाची कास धरीत आला आहे. आपल्या सर्वांगीण उन्नतीचा केंद्रबिंदू म्हणजे धर्मच !

धैर्यशील होणे, क्षमा करणे; स्वतःचे मन आपल्या ताब्यात ठेवणे, चोरी न करणे, आत व बाह्य स्वरूपाची पवित्रता राखणे, सदाचार, सद्‌बुद्धी, सत्यभाषण आणि अ–क्रोध ही धर्माची सामान्य लक्षणे होत. आणि ही लक्षणे प्रत्यक्षात आचरून प्रत्यकाने जर आचरण केले तर पृथ्वीतलावर स्वर्ग नाही का निर्माण होणार ? खरेच आहे. " यतो धर्म-स्ततो जयः "

× × ×

## ' पाश्चात्य सभ्यता ' केवळ मृगजळच !

' आपल्या पूर्वजांपासून ज्या श्रेष्ठ संस्कृती आणि महान धर्माचा विकास घडून आला आहे त्याचा आपणास अभिमान नको काय ? ' अशी पृच्छा करून आजच्या नटव्या चालीरीतींकडे बघून सेठजी मोठ्या खेदाने म्हणत असतात की; " आजचा भारतीय तरुण पाश्चिमात्य ' सभ्यतेच्या ' मागे लागून खरोखर ' पागलच ' होत आहे ! परंतु ही वरपांगी भासणारी सभ्यता म्हणजे केवळ मृगजलच आहे. कारण ती कितीही प्राशन केली, तरी त्यामुळे तृषा भागणार नाही ! आणि म्हणूनच आजच्या तरुण भारतीयांना माझी नम्र विनंती आहे की, भगवान रामचंद्र, योगेश्वर कृष्ण, महाराणा प्रताप, गुरु गोविंदसिंह व छत्रपती शिवाजी महाराज यांचा त्यांनी आदर्श ठेवावा, त्यांचा अभिमान बाळगावा व स्वतःचे जीवन राष्ट्रकल्याणार्थ तेजस्वी बनवावे. "

## आमचे चार प्रमुख मानबिंदू

'आपल्या प्राचीनतम अशा भारत देशाचे अनेक मानबिदु आहेत त्यांना आपण कसे सोडू शकतो ?' असा प्रश्न करून सेठजी पुढे म्हणतात की, 'भारत माता' आपला सर्वात मोठा मानबिंदू असून दुसरा मानबिंदू 'गोमाता'. तिसरा मानबिंदू 'आपली प्राचीन वर्णव्यवस्था' आणि चौथा मानबिंदू 'संस्कृतनिष्ठ हिंदी राष्ट्रभाषा' होय.

## यतो धर्मस्ततो जयः

आपल्या देशात धर्माची प्रतिष्ठा नेहमीच होत आली आहे. धर्माकरिता तर आपल्या पूर्वजांनी नि राष्ट्रवीरांनी प्राणाचा होम करून सर्वस्वाचा त्यागही केला आहे !

तसे पाहू गेल्यास मनुष्य आणि पशुपक्ष्यात मुख्य फरक जर कोणता असेल, तर तो धर्माचा ! खरेच आहे, मनुष्यमात्रात जर धर्म, सुबुद्धि आणि सुविचार नसला तर तो पशुसमानच नाही काय ? आणि म्हणूनच जे लोक धर्माचरणाने वागतात ते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शेवटी विजयीच होतात ! 'यतो धर्मस्ततो जयः ।।' हे अगदी खरे आहे. आणि जे धर्माची हत्या-पायमल्ली अथवा अवहेलना करतात, त्यांचे तर अकल्याणच होत असते. धर्माच्या मर्यादेमुळेच समाजाचा सदाचार सुरक्षित असतो. मनुष्य परोपकार करतो, त्यामुळेच सर्वत्र सुख व शांतीचे साम्राज्य पसरत असते.

एक काळ असा होता की, धर्मासाठीच भारताचा छोटा बालक 'जीवन खेळ' समजून त्यासाठी हसत हसत मरून 'चिरंजीव' होत होता ! पण आज ? आज त्याचा आपणास विसर पडलेला दिसतो खरा ! आज खरोखरच असल्या राष्ट्रीय धर्माची ज्योत जागवून ती घराघरातून प्रज्वलित होणे नितांत आवश्यक नाही काय ?

## 'धर्मांवाचून प्रगती कैची ?'

ज्यात धर्माचा अंतर्भाव राहील, असेच आपले कार्य असावे, मग ते सामाजिक, सार्वजनिक असो की वैयक्तिक–गृहस्थी !

आपली दिनचर्या कशा प्रकारची हवी ? कशा प्रकारचे भोजन असावे ? कोणत्या स्थानी भोजन करावे ? फार काय झोप घेणे व पोषाख करणे, इ. बाबतीतही आपल्या धर्माने काही नियम करून ठेवले आहेत. आपल्या ऋषिमुनींनी सर्वसाधारण माणसासाठी धर्म–व्यवस्था निर्धारित करून ठेवली आहे. आणि त्यानुसार जीवन घडविल्यास खरोखरच भौलिक व पारलौकिक सुख प्राप्त होत असते. धर्म हाच मनुष्यत्वाचे लक्षण आहे. आणि म्हणूनच आपल्या धर्मशास्त्रात त्याची थोरवी विषद करताना म्हटले आहे—

आहार निद्रा भय मैथुनञ्च,<br>
सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।

धर्मो हि तेषामधिको विशेषः,
धर्मेण हीना पशुभिः समानाः ।।

धर्म व संस्कृतीचा विषय निघाला की, रायसाहेब म्हणतात-" आपल्या भारतात तर धर्माची प्रतिष्ठा नेहमीच होत असते. मनुष्य व पशूत जर मुख्यत्वेकरून कोणता फरक असेल तर तो धर्माचाच ! जे लोक धर्माचा आश्रय धरतात, त्यांचा नेहमी जयच होत असतो, आणि जो धर्माची हत्या अथवा अवहेलना करतो, त्याचे अ-कल्याणच होत असते. धर्माच्या मर्यादेतच समाजात सदाचाराचे अस्तित्व टिकून असते. मनुष्याने परोपकार केल्यामुळेच सर्वत्र सुख–शांतीचे साम्राज्य पसरत असते. एक काळ असा होता की, भारतभूचा बच्चा–बच्चा धर्मप्राण होत असायचा–धर्मासाठी प्राणाची बाजी लावणे म्हणजे खेळ समजायचा; पण आज मात्र ही राष्ट्रीय भावना आपल्यातून लोप पावत चालली आहे, तिला जागविणे आवश्यक आहे !"

## धर्म तोच की जो—

तसे पाहू गेल्यास आपल्या भारतीय जीवनप्रणालीत धर्माला महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. आणि म्हणूनच, ज्यात धर्माचा समावेश नाही, असे कोणतेही कार्य आपल्या हातून होऊ नये. फार काय खाणे, पिणे, बोलणे, वस्त्र परिधान करणे, झोपणे, इ. रोजच्या दिनचर्येतही आपल्या ऋषि-मुनींनी सांगितलेली बंधने पाळावयाचे काही नियम सांगून ठेवले आहेत. पण त्याचे आपण कितपत पालन करतो ?

मनु महाराजाने धर्माची एकूण दहा ठळक लक्षणे विशद केली आहेत, आणि ती जर आपण ग्रहण केली तर खरोखरच आपले जीवन धन्य होऊन जाईल.

धैर्य ठेवणे, संयमपूर्ण जीवन व्यतीत करणे, कुणाचे शोषण वा वस्तु हरण न करणे, शरीर व मन स्वच्छ ठेवणे, इंद्रियांवर नियंत्रण असणे, विचारपूर्वक कार्य करणे, आणि खरे बोलणे-ही दहा लक्षणे म्हणजे जीवनातील सारच ! वास्तविक धर्म तोच की, जो मनुष्याचे उत्थान करतो, कल्याण करतो ! 'यतो धर्मस्ततो जयः' जेथे धर्म तेथेच विजय आहे !

धर्माच्या नाशामुळेच समाजाचा नाश होत असतो. आणि धर्म हा त्याचे रक्षण करणारास रक्षण देत असतो. याकरिता माणसाने धर्माचरणानेच वागण्याचा कृतनिश्चय करावा.

## 'भारतीयत्वाचा अभाव' हा कलंकच !

आपल्या देशापुरता जरी विचार केला, तरी भौतिक क्षेत्रातील कृषि, औद्योगिक व यांत्रिक दालनात आज आपण कमालीची उत्क्रांती करीत असलो, तरी आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीशी मात्र आपली दिवसेंदिवस प्रतारणाच होत असलेली दिसून येते ! फार काय आमचे आचार, व्यवहार, आहार व वेषभूषा सर्व काही पाश्चि-

मात्य संस्कृतीशीच निगडीत होत चालल्या आहेत ! भारतीय संस्कृतीमुळे पूर्वी प्रौढ लोकात प्रति–सन्मानाची जी भावना प्रबळ रूपात वास करीत होती, युवक व तरुण मुलीत जे शील, सदाचार व लज्जेची जी भावना होती ती आता झपाट्याने कमीकमीच होत चालली आहे. प्राचीन भारतात आपले गुरुजन व समाजाविषयी जी श्रद्धा आणि आदर वास करीत होता, तोही केवळ पाश्चात्य अशा सभ्यतायुक्त भासणाऱ्या वातावरणामुळे लुप्तच होत आहे. मग अशाने देश प्रगतीकडे जाणार की अधोगतीकडे ?

आणि याला कारण एकच, ते म्हणजे भारतीय दृष्टिकोनाचा अभाव !

## 'संस्कृती' केवळ विचारात नको, आचरणात हवी !


धर्माचे अनुसार आपण जो आचार, विचार व व्यवहार करतो ते सारे आपल्या संस्कृतीचे एक अंग आहे. आणि अशा ह्या संस्कृतीचे रक्षण करण्यातच आपल्या राष्ट्राचा गौरव आहे. पण असली ही संस्कृती केवळ विचारात नको, तर ती प्रत्यक्षत: आचरणात हवी. खरोखर आपली संस्कृती ही सर्व जगात श्रेष्ठ आहे. आणि तिच्या दृढतेवरच हजारो वर्षांपासून अस्तित्वात असलेला आपला हिंदु समाज आजही टिकून आहे. विदेशी शासनही आमच्या ह्या सांस्कृतिक निष्ठेला नष्ट करू शकले नाही. खरोखरच भारतीय संस्कृती ही अमर आहे. चिरंजीव आहे !

## ‘संस्कृत’ भाषेला अग्रस्थान हवे !

सद्विचार, सद्भावना व सत्कार्य यातच धर्ममय जीवन समाविष्ट झालेले असते. पण आज समाजात याचीच त्रुटी जाणवत आहे, आणि वर सांगितल्याप्रमाणे पाश्चात्य सभ्यतेच्या मृगजळामुळेच हे सारे घडत आहे. ह्या पाश्चात्य सभ्यतेचा प्रसार मात्र इंग्रजी भाषेमुळे झालेला दिसून येईल. या बाबतीत मनाला एक बाब मात्र नेहमीच खटकत असते, आणि ती म्हणजे स्वराज्यातही अजूनपर्यंत इंग्रजी भाषेचे चालू असलेले वर्चस्व ! जर ह्या इंग्रजी भाषेप्रमाणे संस्कृत ह्या आपल्या ‘देवबोली’ची प्रभुसत्ता देशात सर्वत्र आज अस्तित्वात असती, तर काय बहार होती ?– आणि मी तर असेही म्हणेन की, संस्कृत भाषेच्या प्रभुसत्तेमुळे आज समाजात ओसंडत चाललेल्या अनैतिकता व भ्रष्टाचाराच्या महापुराला पण आळाच बसला असता !


## ‘दुर्जनं प्रथमं वंदे ! सज्जनं तदनंतरम्’ !

रायसाहेबांचे सान्निध्यात बसण्याचे अनेक प्रसंग लेखकास आले असून धर्म, संस्कृती, मानवी कार्य, निःस्पृहता व समाजसेवा इ. धार्मिकतेला संबंधित अशा अनेक विषयांची चर्चा ऐकण्याचे त्याला अनेक प्रसंग पण आले आहेत. या बाबतीत रायसाहेबांचे विचार किती शुद्ध, सात्त्विक व निरभिमानी स्वरूपाचे असतात, ते खरोखरच बघण्यासारखे असल्यामुळे त्यातील काही भाग खाली विशद केला आहे—



रा. सा. सेठ गोपीकिसनजींचे डौलदार वडणीचे मुबई येथील आनंदभवन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नों: दि: ........




तुमसर येथील हनुमानताल

'जनसेवा' हा विषय निघताच ते म्हणतात—
—"मानवधर्माचे आद्यकर्तव्य जर कोणते असेल, तर ते जनसेवा हेच होय. असहाय, गरजू आणि दारी आलेल्या याचकांना मी जे द्रव्यदान करतो ते याच दृष्टिकोनातून !"

—"लोकांच्या सार्थकी लागावे; त्याला भेडसावणारी चिंता आपण दूर करावी व अशा रीतीने माझ्या दारी विवंचनेत आलेला कुणीही जीव हा हसतमुखानेच जावा, असे मला नेहमी वाटते ! व त्यानुसार मी अशा बुभुक्षू जीवास सहाय्यभूत होत असलो तरी पण त्या याचकास, मी त्याला लागणारी आर्थिक मदत व अन्य सहाय्य पूर्णपणे देऊ शकलो नाही, असे वाटून, त्याच वेळी मनाला खटकल्यासारखे पण होते !"

"हे झाले, ज्यांना खरोखरच आर्थिक समस्या भेडसावीत आहे, त्यांचेबाबत ! पण तुमचेकडे जसे संकटात सापडलेले, गरजू याचक येतात, तसेच ज्यांची आर्थिक स्थिती अगदी ठाकठीक असते आणि जे लोक तुमचा आतून द्वेष पण करतात, तुमची निंदा करतात, तुमचेविषयी अत्यंत घृणास्पद बोलतात, असेही भलेबुरे जीव प्रसंग पडला तर तुमचे दाराशी येऊन—आणि वरपांगी तुमचे गोडवे गाऊन खिसे गरम करून जातात त्यांचे काय ? अशांना 'दान' म्हणून दिलेला पैसा पापात नाही का जात तुमचा ?" मी म्हणालो.

"अहो, छट् छट् ! अशांना 'दान' म्हणून सार्थकी लावलेल्या पैशांचा जर तो दुरुपयोग करील, तर त्यांत माझा काय दोष बरे ?" सेठजींनी त्याचा खुलासा केला. ते पुढे म्हणाले—"अहो ! आपल्या ग्रंथात एक संस्कृत सुभाषित आहे. 'दुर्जनं प्रथमं वंदे! सज्जनं तदनंतरम्!' माझी निंदा करणारे बरळोत बिचारे माझेविषयी काही ! —आणि तरीही असे लोक 'याचक' म्हणून जर माझे दाराशी आले, तर त्यांना रिक्तहस्ताने परतवून माझ्या नेहमीच्या पुण्यकर्माचे आड मी कशाला येऊ बरे ? कुणी निंदा वा वंदा ! माझा तर स्वधर्माचा हा धंदाच असतो नेहमीचा !"

खरेच आहे ! अहंकार, घृणा, राग, द्वेष इ. दुष्प्रवृत्तींच्या पलीकडे गेलेली त्यांची मनोवृत्ती, स्थितप्रज्ञ स्थितीत आरूढ होऊन "जैसा आपुला जीव। तैसे सर्व लोक। न करी विवेक। पशू जैसा ॥" ह्या तुकोबांच्या उक्तीनुसार जर धर्माचरणात रत होऊन दानधर्म करण्यात मग्न रहात असली तर ते योग्यच नव्हे काय ?

## अहो, त्यांचाही आत्मा संतुष्ट करा !

गोरगरीब, अनाथ-अपंग जीव मग तो कुठलाही व कोणत्याही जातिपंथाचा का असेना, त्यांचे नजरेपुढे आला की, सेठजीचे अंतःकरण पिळवटून निघते, आणि 'परमेश्वराचाच तो एक अंश' ह्या भावनेने ते अशा अभागी जिवांची शोचनीय स्थिती नष्ट करण्यास यथाशक्ती झटत

असतात! अशा गोरगरिब नि लाचार जिवांचा विषय निघाला की, ते म्हणतात–" तोही परमेश्वरानेच निर्माण केलेला आपल्यासारखा एक जीव आहे. मग अंतःकरणाने अंतःकरणास ओळखून अर्धनग्न अवस्थेतील त्यांच्या शरीरास कपडा मिळावा, भुकेने व्याकूळ होऊन पाताळात पोट गेलेल्या अशा दुःखी लोकांच्या पोटात आपण खातो, त्याच्या $\frac{1}{8}$ प्रमाणात का होईना, पोळीचा तुकडा जावा; अन् घरदार व आर्थिक दृष्टीने गांजलेल्या अशा जिवांना आपणासारख्यांनी सक्रिय सहयोग देऊ नये काय? अहो, अशा दुःखी पीडितांची सेवा करण्यासाठीच तर परमेश्वराने मला एवढ्या संपत्तीवर विराजमान केले आहे! मानवाने खरा 'मानवधर्म' ओळखून मानवासारखेच वागले पाहिजे."

फार काय खाजगी बैठकीत रायसाहेबांचे तोंडून काय उद्‌गार निघतात ते बघा. ते अगदी मोकळ्या मनाने म्हणतात–" अहो, ही एवढी धनसंपदा काय कामाची? ती आज आहे, तर उद्या नाही! अशा ह्या क्षणभंगुर इस्टेटीचा हव्यास करून मोक्ष काय मिळणार आहे मला! आणि म्हणूनच मी घरच्या मुलाबाळांना तर नेहमी असेच म्हणतो की, बाबांनो तुमच्या शरीरावरचे हे एवढे किमती कपडे, तुमच्या जोड्यांना लागणारा पालिशखर्च आणि खाणेपिणे इ. पायी दैनंदिन होणाऱ्या खर्चात काटकसर करून उरलेल्या अर्थनिधीतून तुम्ही जरी एखाद्या अभागी जिवाला संतोषविले तरी बरेच पुण्यसंचय प्राप्त केल्याचे भाग्य तुमच्या वाट्यास येईल."

## कर्मचाऱ्यांविषयीची सुहृदयता

आणि ह्याच विषय एका खाजगी बैठकीत निघाल्यावर ह्या दानवीर–सुहृदय सेठजींनी 'स्वत:ची मुले व फर्मचा कर्मचारी वर्ग' ह्या विषयाला हाताळून प्रत्यक्ष लेखकाजवळ काय उद्‌गार काढले बघा—

"तसे पाहू गेल्यास, आजच्या महागाईच्या काळात आमचे फर्ममध्ये जे अनेक कर्मचारी जी नोकरी करतात ती केवळ स्वत: व घरच्या मुलाबाळांच्या पोटाची खळगी भरून स्वत:चा प्रपंच चालविण्यासाठीच !

"—पण आम्ही दिलेल्या अल्पस्वल्प वेतनातून ह्या कर्मचाऱ्यांना घरचे जीव संतुष्ट करता येतात का? बिचारे कर्मचारी, कितीही केले तरी परावलंबी जीव !

"—आणि म्हणून अगदी लाचार होऊन, अगतिकपणे जर एखाद्या कर्मचाऱ्याने–नोकराने स्वत:च्या कर्तव्यात ढिलाई केली, कुणी पैशाच्या हिशेबातही गडबड केली, तर अशांना वाईट वाटेल, त्यांना दु:ख होईल, अशा रीतीचे वर्तन त्यांचेशी तुम्ही बिलकूल करू नका. क्षमा करा त्यांना ! असे मी स्वत:च्या मुलांना नेहमीच सांगत असतो."

याबाबतचे अधिक स्पष्टीकरण करताना सेठजी म्हणतात—"अहो असे जे कर्मचारी चोरी वा कामचुकारपणा करतात, ते बुद्धिपुरस्सर नव्हे, तर घरच्या आर्थिक ओढाताणीमुळेच त्यांना दुर्दैवाने तशी बुद्धी सुचते. ते तरी काय करणार बिचारे ! अहो, त्यांचेमुळेच आम्ही हे

सुखाचे दिवस काढीत आहोत. मग अशा लोकांवर आपण दया नको का करायला ? ''

थोर सेठजींचे केवढे हे विशाल अंतःकरण !!

## जीव तीळ तीळ तुटतो !

थोरांची अंतःकरणे फुलाहून नाजूक असतात हेच खरे !

'धर्मशील', 'धर्मभूषण' आणि 'भारतीय संस्कृतीची सोज्वळ मूर्ती' अशा रा. सा. सेठ श्री. गोपीकृष्णजींचे अंतःकरणही असेच अत्यंत नाजूक-मृदु आहे !

अनाथ अपंगांच्या लाचार प्रापंचिक समस्या आणि त्या अनुषंगाने त्यांना आंशिक रूपाने का होईना सार्थकी होण्यासाठी सेठजी जेव्हा 'सामाजिक सेवा' म्हणून दान करण्यास पुढे येतात; गोरगरीबांच्या 'फाटक्या' प्रपंचाला ठिगळ लावायला त्यांचा हात जेव्हा पुढे सरसावतो; त्या वेळी 'अशा अभागी जिवांची आपणाकडून मनाजोगी सेवा घडू शकत नाही' असे वाटून त्यांना मोठी खंत वाटते, त्यांचा आत्मा तीळ तीळ तुटतो; अंतःकरण पिळवटून निघते! आणि याच अनुषंगाने प्रस्तुत लेखकाशी 'हितगुज' करताना एके प्रसंगी हताश होऊन ते म्हणतात—

" ····माझ्या आयुष्याच्या जीवनप्रणालीत 'धर्म' हा 'प्रधान' भाव असून 'दान' हे त्याचे 'उप-अंग' म्हणून जनता जनार्दनाची सेवा त्याच दृष्टिकोनातून करण्याचा मी

अल्पप्रमाणात यथाशक्ती प्रयत्न करीत असतो. पण ज्यांना मी ‘ दान ’ म्हणून मदत देऊन सार्थक होण्यासाठी जे काय कार्य करीत असतो, ती मदत व ते दान परिपूर्ण होत नसल्यामुळे माझे अंत:करण अशा गोरगरीब याचकांच्या दु:खी दशेकडे पाहून पिळवटून निघते, मन तीळ तीळ तुटते ! ”

## ‘ हे एवढे ऐश्वर्य कशासाठी ? ’

आपण एवढे ऐश्वर्यसंपन्न आहोत, ‘ लक्ष्मीपुत्र ’ म्हणून लोक समजतात आपणास ! आणि गीतेत सांगितल्याप्रमाणे धन, वक्तृत्व, धैर्य आणि प्रसंगावधान ह्या चार सूत्रांपैकी ‘ धनसंचयाची ’ जोड जरी आपल्या प्रापंचिक जीवनास प्राप्त झाली असली; त्याला पूर्वकर्म–संचिताची जोड मिळून धर्म–संस्कृतीचा मळा पिकविण्याची सुवर्णसंधी स्वत:च्या ह्या जीवनप्रवाहात; त्या दयाघन प्रभूच्या कृपाप्रसादे जरी आपणास मिळाली असली, तरी ‘ आहे हे एवढे मोठे ऐश्वर्य कशासाठी ? ’ याचा उहापोह ते स्वत:च्या पुत्रापाशी ‘ धर्म–दातृत्व आणि मानवाचे कार्य ’ ह्या विषयासंबंधी चर्चा करताना जेव्हा कधी दिसतात, त्या प्रसंगी तुमसरचा हा देवमाणूस; भारतीय संस्कृतीची सोज्वळ मूर्तिमंत ‘ माऊली ’ आणि हा ‘ आधुनिक दानी कर्ण ’ खरोखरच आमच्या तुमसर नगरीत देवाने अवतरविला हे आमचे सु–भाग्यच ! असे स्वाभिमानपूर्वक वाटून मन आश्चर्याने थक्क झाल्याशिवाय मात्र रहात नाही !

## एवढी चैनबाजी का म्हणून ?

--आणि म्हणूनच ते स्वपुत्रांना म्हणतात-' हे एवढे ऐश्वर्य कशासाठी हे जाणून घ्या ! स्वतःच्या मुलांच्या सूटबुटांसारख्या नित्योपयोगी पण शौकापायी जास्तीचा पैसा खर्च झालेल्या वस्तू; त्यासाठी खर्च होणारा पण डोळयात न भरणारा पॉलिश खर्च आणि फार काय उंची कपडे यात यथोचित-योग्य अशी काटकसर करून त्यापायी उरलेला पै पैसा जर समाजातील गोरगरिबांच्या सेवेसाठी सार्थकी लागला तरीही आत्मसमाधान लाभून मनाला जो आनंद होईल त्याची बरोबरी जगातील अन्य कोणती वस्तू तरी करील काय ?

दिवसभर काबाडकष्ट करून डबडबलेल्या घामाची; त्या गरिबांच्या थकल्या भागल्या जीवात्म्याची; त्यांच्या अंग मेहनतीची-कष्टाची सदासर्वकाळ जाणीव ठेवून त्यांच्या दुःखी मनाची जाणीव स्वतःच्या अंतःकरणात सदा तेवत ठेवणे आणि चटणी-भाकर खाऊन अर्धपोटी रहाणाऱ्या त्या कष्टी पण अभागी जिवांना जाडयाभरडया अन्नाचे सुखाचे चार घास तरी गिळता यावे यासाठी वर निर्देशित केलेला तुरळक चैनीचा खर्च जरी कमी केला तरी त्यामुळे केवढी मोठी भरीव सेवा करता येईल बरे ?

## कुठे ऊन कुठे छाया !

'प्रत्येक माणूस हा त्या अथांग सागरातील जल-बिंदूप्रमाणे समाजाचा छोटासा घटक असून त्याने पाण्याच्या

एका थेंबागणिक समाजसागराशी एकरूप झाले पाहिजे.' असे ते नेहमीच म्हणतात.

पण सर्वव्यापी परमेश्वराच्या ह्या सृष्टिरूपी अतिविशाल घरात जे चराचर जीवजंतु आणि वस्तूचे अस्तित्व प्रतिबिंबित झालेले आहे व त्यांच्या वेगवेगळचा स्वभावधर्माप्रमाणे भिन्न भिन्न प्रकृतीच्या प्रवृत्ती धारणेप्रमाणे ज्या काही घडामोडी प्रत्यही घडतांना आपण बघतो आहोत, त्यामुळेच तर आपणास कुठे श्रीमंती तर कुठे गरिबी, कुठे दुःख तर कुठे सुख, कुठे खोल दरी तर कुठे उंचच उंच पर्वत; कुठे अन्न तर कुठे कदन्न; कुठे सुपीक अशी भुसभुशीत माती तर कुठे खडकाळ प्रदेश असा चित्रविचित्र देखावा दिसत आहे! पूर्वजन्माचे कृतकर्म पण त्याला कारणीभूत झालेले असते!—आणि ह्याच निसर्गाच्या नियमास धरून संतशिरोमणी श्री. ह. भ. प. तुकाराम महाराजांनी एका अभंगवाणीतून जे मार्मिक बोल काढले आहेत त्याचे स्मरण करताना—

धन्य देवा तुझी माया। कुठे ऊन कुठे छाया ॥१॥
कुणा देशी हत्ती घोडे। कुणा नाही पायी जोडे ॥२॥
कुणा पुत्र कन्या देशी। कुणा वांझोटी ठेवशी ॥३॥
कुणा देशी साडी चोळी। कुणी अखंड चिंध्या गाळी ॥४॥
तुका म्हणे अगा देवा। दया सर्वांवरी ठेवा ॥५॥

अशी आर्त हाक देवापाशी आमचे सेठजी पण करीत असताना दिसतात!



स्व. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद आणि श्री. रा. सा. सेठ गोपीकृष्णजी राजारामका
नागपूर येथील हिंदी मोर भवनाच्या उद्घाटनप्रसंगी

खरेच आहे. गरीब लोकांचे जीवन म्हणज 'खायला कोंडा नि उशाला धोंडा' असल्या चौकटीचे! आणि नाही तरी ऊन, वारा, पाऊस यांचा तडाखा झेलीत फाटक्या वस्त्रानिशी; अर्धपोटी भाकरीच्या तुकड्यावर; मोडक्या तुटक्या चंद्रमौळी घरात, नव्हे झोपड्यात निवास करून अनवाणी चालणारे किती तरी लोक समाजात आहेत ना?

—आणि अशा लोकांच्या जीवनात येणारे 'खड्डे' बजविण्यासाठी आम्हासारख्या धनिकांचा पैसा अंशतः का होईना जर सार्थकी लागला नाही, तर मग हे एवढे मोठे ऐश्वर्य तरी कशासाठी? ही एवढी मोठी संपत्ती तरी काय कामाची?

ह्याच दृष्टिकोनातून प्रापंचिक दैनंदिन व्यवहाराचे नित्य स्मरण ठेवून 'मालक-नोकर' यांचा परस्पर व्यवहारसंबंध नेहमीच क्षमाशील व परोपकारी वृत्तीचा असावा असे ते नेहमीच म्हणतात.

## 'त्या बापड्यांचा काय दोष?'

रायसाहेबांकडे भारतवर्षातील काशी-वृंदावन, मथुरा, जगन्नाथपुरी, प्रयाग, रामेश्वर, आणि अशा अनेक दूरदूरच्या क्षेत्रांतून संत, विद्वान, पंडित, याचक, सार्वजनिक कार्यकर्ते आणि प्रापंचिक गृहस्थी लोक आर्थिक आश्रयार्थ नेहमीच येत असल्याचा उल्लेख आपण मागील एका प्रकरणात केला आहेच. आणि अशा प्रकारे वर्षाकाठी केवळ

एक दोन वेळा नव्हे, तर प्रतिदिनचा त्यांचा ‘दानत’ खर्च सुमारे दोनतीनशें रुपयांपर्यंत सहजच आजही चालू आहे !

पण ह्या विषयाचा उहापोह प्रस्तुत पुस्तकातून अनेकवेळा आला असल्यामुळे आता तिकडे न वळता वर्तमान काळच्या ‘नटव्या’ जगात स्वच्छंदपणे वावरणाऱ्या अनेक होतकरू व सामाजिक तळमळ बाळगणाऱ्या तरुणांना जो हितोपदेश करतात; खाजगी बैठकीत अथवा एखाद्या सार्वजनिक समारंभाच्या प्रसंगी याबाबतीत ‘समाजसेवा व काळच्या डोईचा माणूस’ ह्या विषयावर जे विचार मांडतात, त्यावेळी ऐश्वर्यात वाढलेल्या ह्या लक्ष्मीपुत्राचा ‘देश, समाज व सेवा’ ह्या बाबतीत किती खोल अभ्यास झालेला आहे बरे? असे वाटून मन खरोखरच थक्क होते !

आणि ह्याच संदर्भात पण प्रापंचिक जीवनातील खाजगी व्यवहारात माणसाने वागायचे कसे ? याचे विवेचन करताना स्वत:च्या मुलांचाच दाखला समोर ठेवणारे हे रा. सा. सेठ गोपीकृष्णजी काय म्हणतात बघा—

“माणसाचे जीवन म्हणजे एक देवाने रचलेली ‘नाटकशाळा’ असून सर्कशीत ताणलेला विशाल तंबू हा जसा तणाव खिचलेल्या अनेक खुंट्यांवर उभारलेला असतो तद्वत हा माणसाच्या प्रपंचाचा डेराही पण घरच्या गडी माणसांच्या–नोकरांच्या भरवशावर बहुतांश प्रमाणात आधारलेला असतोच ना? अर्थात् घर वा एखाद्या फर्मचा मालक नि त्याचा नोकर यांच्यातील नाते प्रेमभावाचे,

परस्पर विश्वासाचे आणि एकूण खेळीमेळीचेच नेहमी असायला हवे. पण हे जरी खरे असले तरी—

" ····समजा, असा विश्वासपात्र एखादा नोकर गडी मालकाचे काम करतांना पाच दहा रुपये खात असल्याचे दृष्टोत्पत्तीस आलेही कधी काळी ! तरी त्या गरीब बापड्याचा त्यात दोष तरी काय? अहो, गांजलेली परिस्थितीच त्यांला तशी करायला भाग पाडते ! खाजगी अडचणीच्या कचाट्यात गांजलेली एकूण त्याची प्रापंचिक अवस्थाच त्यास बुद्धिभ्रम करायला भाग पाडते···· ! "

आणि स्वत:चा दाखला समोर मांडून सेठजी पुढे म्हणतात—

" आपण नाही का लाखो रुपयांच्या उलाढाल्या करीत? 'व्यापाराचा' पसारा जगात किती प्रकारे नि किती विशाल प्रमाणात पसरला आहे ? स्वार्थ कुणाला सुटला आहे ? आणि समजा त्यातही धर्म, नीतिमत्ता, स्वदेशप्रेम, आणि राष्ट्राभिमान जागृत ठेवून जरी मोठमोठ्या व्यापारविषयक उलाढाली प्रत्यही घडत असल्या, तरीही जगातील लाखो–कोट्यवधी भांडवलावर आधारलेल्या मोठमोठ्या कंपन्यांचे हातूनही किती 'प्रमाद' घडतात हे आपण बघतोच ना ? "

आणि हे जर खरे, तर मग ज्यांचे भरवशावर आमच्यासारखे धनिक प्रपंचाचा एवढा पसारा चालवितात; ज्या गोरगरिबांच्या निधड्या छातीच्या नि डवडबलेल्या

निथळत्या घामाच्या भरवशावर आपण एवढ्या उलाढाली करतो; त्यांनी जर परिस्थितीवश कधी पाच दहा रुपयांची समजा 'गडबड' केलीही तरी अशा लाचार जिवांच्या—गरीब नोकरांच्या अगोदरच तुटपुंज्या मिळणाऱ्या मासिक वेतनातून कपात करून त्यांच्या मूलभूत जीवनात अधिकच गडबडीचे व अस्थिरतेचे वातावरण तरी निर्माण करण्याचे कठोर कर्म का बरे करावे ?

अशा गरीब नोकरांच्या वेतनातील कपात दूरच राहो, पण अशा हीनदीन जिवांना 'शब्दा'नेही दुखवू नका, त्यांचा कष्टी आत्मा दुःखी करू नका, त्यांना कठोरतेने बोलू नका तर 'अंतरी निर्मळ। वाचेचा रसाळ' हा विशुद्ध प्रेमभाव मनी जागृत ठेवून अत्यंत रसाळ, मृदु वाणीचा वापर करून अशा गडीनोकरांना त्यांची चूक वा नजरचूक त्यांच्या नजरेसमोर आणून द्या आणि 'नोकर—सेवक' म्हणून त्यांच्या कृतकर्तव्याची जाणीव करून द्या त्यांना ! असा हितोपदेश ते स्वतःच्या मुलांना करतांना दिसतात !

## कुणी निंदा वा वंदा !

तात्पर्य, अहिंसा परमोः धर्मः। या उक्तीनुसार रायसाहेबांच्या जीवनसूत्राचे रहाडगाडगे आजतागायत प्रत्यही चालत आले आहे आणि पुढेही अखेरपर्यंत चालत रहाणार हे खास ! कुणी निंदा वा वंदा। पण माझे कृतकर्म मात्र असे हे सुरूच असे ते नेह ी म्हणतात.

ग्रंथ संग्रहालय,
(७७) वि:
नोंद दि:

## ‘ वृक्ष ’ एक आदर्श उदाहरण !

दुर्जन–खळनिंदक लोकांवरही त्यांची मोठीच कृपा ! आज जे लोक रायसाहेबांची निंदा करतील, तेच लोक उद्या त्यांच्या वाडयात जाऊन प्रापंचिक आर्थिक मदतीसाठी त्यांची याचना करतील. आणि जात्याच परोपकारी प्रवृत्तीचे सेठजी त्यांना यथाशक्ती सहाय्यभूत होतांना दिसतात पण !

‘ पण अशा समाजघातकी कुप्रवृत्तीच्या लोकांना दिलेले दान पापात जाते की पुण्यात ? ’ असा मार्मिक प्रश्न एकदा मी त्यांना विचारला असता ते म्हणाले—

“ … परजलेल्या कुऱ्हाडीने वृक्षाच्या बुंध्यास कुणा मोळीविक्याने काही घाव घालून त्या वटवृक्षाच्या साल-पटाचे काही तुकडे सोलण्याचा प्रयत्न केला. लांब बासाच्या एखाद्या तुकडयाने हात लांबवून त्याच फांद्यांच्या वाळल्या बारीक काटक्या पाडून त्याची चुलीत लावायला मोळी बांधली अथवा त्याच वृक्षाच्या बुंध्यास कुऱ्हाडीचे घाव घालून त्याच्या बारीक किलच्या काढण्याचा प्रकार केला, तरीही रानमाळात दिवसभर अनवाणी फिरून घामाने डब-लेल्या त्या मोळीविक्यास अंमळ विसावा मिळावा नि शीतल छायेचा झुळझुळ वारा लागून थकल्या भागल्या जिवास अंमळ विश्रांती मिळावी म्हणून विसावा घेण्यासाठी आलेल्या त्या वृक्ष–कंटक माणसास काय ते झाड दूर लोटत असते ? ”

किती सुंदर सात्विक सोज्वळ विचार आहेत सेठजींचे हे !

## 'हा स्वभाव उपकार पराचा'।

आणि म्हणूनच जात्याच मृदु, दयाशील स्वभावाच्या आपल्या ह्या सेठजींच्या स्वभावात, नव्हे रक्तातच 'कंटकेनैव कंटकम्' वा 'शठं प्रति शाठ्यं' अथवा असल्या प्रकारचा व्यवहार मुळी नाही तर अशा लोक-दृष्टया दुर्जन आणि खळनिंदक म्हणविणाऱ्या जनांच्या आत्म्यातही परमेश्वराच्या चैतन्याचेच एक आंशिक रूप वास करीत असून दुःख, दारिद्र्य आणि एकूण प्रतिकूल परिस्थितीमुळे जरी त्याचे वर्तन समाजघातकी झालेले दिसत असले तरी पण योग्य संस्काराची जोड मिळून भविष्यकाळात असे लोकही 'वाल्याचे वाल्मीकी'ही होऊ शकतात अशी त्यांची धारणा आहे !

—आणि हे जर खरे; तर मग असल्या लोकदृष्टया खळ, निंदक, दुर्जन लोकांना–अशा याचकांना मी काय यथाशक्ती सहाय्यभूत होण्याचा जो प्रयत्न करतो, ते माझे कृतकर्म पापात नव्हे तर हमखास पुण्यातच जाणार; त्यामुळे पुण्यच पदरी येणार आणि समजा, अशी माणसे मी दिलेल्या दानाचा दुरुपयोगही करीत असतील, तर त्याला सर्वस्वी जबाबदार ती माणसेच रहाणार ! त्यात आमचा दोष तो काय ? असेही ते बोलून दाखवितात.

तात्पर्य, 'रायसाहेब म्हणजे विशुद्ध भारतीय संस्कृतीची सोज्वळ मूर्तीच' असे कुणी म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती खचित नाही ! फार काय त्यांच्या जीवनाकडे

कुणीही न्याहाळून बघितल्यास सेठजी म्हणजे गरीब अनाथ अपंगाची कामधेनू; संतमहात्म्यांच्या विसाव्याचे आश्रय-स्थान; आणि सनातन हिंदु धर्माची चालती बोलती पताकाच ! आणि म्हणूनच—

वृक्ष फार लवती फलभारें ।
लोंबती जलद घेउनि नीरे ।।
थोर गर्व न धरी विभवाचा ।
हा स्वभाव उपकार पराचा ! ।।

अशी आहे एकूण त्यांच्या दैनंदिन व्यवहाराची घडण !

# काही स्मृतिफलके


## १. दया क्षमा शांति । तेथे देवाची वसती !

वर सांगितल्याप्रमाणे रायसाहेब सेठ गोपीकृष्णजी हे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक इ. सत्कार्यात उदारता-पूर्वक सहाय्यभूत तर होतातच, पण संकटकाळी, आपद्‌ग्रस्तांना ते स्वयंस्फूर्तीने मदत करतात, नव्हे प्रत्यक्षतः धावून जातात याचे प्रत्यंतर सन १९६१ च्या आगष्ट, सप्टेंबरमध्ये महाराष्ट्र-राज्यातील पुण्याला व त्यानंतर विदर्भाला भीषण पुराचा नि पावसाचा जो तडाखा जाणवला त्याप्रसंगी दिसून आले.

त्या विनाशकाली तांडव नृत्यात वैनगंगा माईलाही महापूर आला व तिच्या काठावरील असंख्य खेडी पुराच्या पाण्यात बुडाल्यावर त्या अभागी जिवांना निवारा देण्या-साठी तेवढ्या रात्रीही ह्या दानवीरांनी स्वतःच्या मोटारी, ट्रक्स रवाना करून हजारो पूरपिडितांना नगरातील माल-वीय प्राथमिक शाळेत आणून सोडले, व गावातील अन्य कार्यकर्त्यांसोबत स्वतः जातीने प्रत्येक अभागी जिवाची विचारपूस करून स्वतःच्या अन्न, वस्त्रांनी त्यांना संतोषविले आणि एवढेच नव्हे तर सरकारची वाट न पाहता पूर-पीड़ितासाठी अल्पकालीन निवारा म्हणून त्यांनी कच्च्या



तुमसर येथील गोपीकृष्ण हिन्दी हायस्कूलच्या शिलान्यासाचे प्रसंगी
श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासह रा सा. श्री. सेठ गोपीकृष्णजी.



रा. सा. सेठ गोपीकृष्ण हिन्दी हाईस्कूल, तुमसर.

झोपड्या उभारून त्यातून तुमसर भागातील शेकडो पूर-पडितांना निवारा दिला. आणि आर्थिक मदत देऊनप्र त्यांच्या विस्कटलेल्या जीवनघडीला स्थिरता येण्यास मदत केली ! आणि अशा रीतीने ह्या कार्यासाठी सुमारे ७–८ हजार रुपयांची सहाय्यता अशा आपद्प्रसंगी तडफातडफी पोहचवून त्यांनी सरकार व देशातील धनिकांसमोर एक उच्च आदर्श ठेवला !

## २. 'केवळ अखेरचा उपाय म्हणून—'

सेठजींच्या दयाशीलतेचे अनेक प्रसंग अनेक व्यक्तींच्या आयुष्यात बघायला मिळाले असतील. त्यांपैकीच एक संग विशद करतांना नागपूरचे प्रख्यात कार्यकर्ते श्री कृष्णलालजी आर्य लिहितात—

" एक परिचित व्यक्ती एका प्रसंगी आर्थिक दृष्टया तक्या भीषण संकटात सापडली होती की, त्यापायी तिइन 'आत्महत्त्या' करण्याचा संकल्प अनेक वेळा केला ! ही बातमी मला कळल्यावर, त्या व्यक्तीचे मी सांत्वन करून अनेक मोठमोठ्या लोकांकडे नेले आणि सदहू व्यक्तीवर ओढवलेले संकट निवारण्यासाठी तिला आर्थिक सहाय्य करण्याची आग्रहाची विनंती केली. पण प्रत्येक वेळी त्या बाबतीत मात्र माझी निराशाच झाली ! सरतेशेवटी अखेरचा उपाय म्हणून मी त्या व्यक्तीस घेऊन रायसाहेबाकडे आलो. सर्व परिस्थितीची त्यांना कल्पना दिली, आणि काय आश्चर्य ? त्या पहिल्याच भेटीत उदार अंत:करणाच्या

ह्या थोर सेठजींनी, कसल्याही प्रकारची अट वा लिखापढी न करता यथोचित असा तिला आर्थिक सहयोग दिला, आणि अशा प्रकारे त्या व्यक्तीस त्या भीषण संकटातून वाचविले ! खरेच असे दानी आणि उदार अंत:करणाचे सत्पुरुष जगात किती बरे सापडतील ? "

## ३. धर्मात्मा पित्याचे धर्मात्मा पुत्र !

रायसाहेबांचे वडील रायबहादूर सेठ गोवर्धनदासजीही मोठेच धर्मश्रद्धाळू ! स्व. सेठ गोवर्धनदासजी एकदा स्वत:च्य आईवडिलांच्या श्राद्धाचे निमित्ताने गया क्षेत्री जात असताना, प्रथम चित्रकूट येथे आले. त्यांनी आपले सामान स्टेशनावरच ठेवले व ते चित्रकूटच्या दर्शनाकडे वळले. सेठजींचे सोबत त्यांची धर्मपत्नीही होती. त्याप्रसंगी, चित्रकूटसारख्या पवित्र तीर्थस्थळी एकही प्रशस्त अशी धर्मशाळा नसल्यामुळे यात्रेकरूंची भारीच आबाळ होत असल्याचे दिसून आले. आणि मग काय ? सेठजींचे तेथील पंडे श्री. वसंतलालजी दुबे यांच्या मदतीने ताबडतोब धर्मशाळेसाठी जागा शोधणे सुरू झाले, व त्या वेळी तेथील एका महंतास वाजवीपेक्षाही जास्त किंमत देऊन, रा. ब. सेठ गोवर्धनदासजींनी स्वत:च्या मातोश्रींच्या स्मरणार्थ चित्रकूटला विशाल आणि सर्व सोयींनी परिपूर्ण अशी धर्मशाळा बांधून दिली !

पवित्र मंदाकिनी नदीच्या सुरम्य तटावर मातोश्रीच्या नावाने प्रख्यात असलेल्या ह्या चित्रकुटाच्या धर्मशाळेत

नेहमीच हजारो यात्रेकरू विसावा घेऊन पहुडलेले तुम्हाला दिसतील ! त्यानंतर पुढे श्रीक्षेत्र प्रयाग येथेही स्वतःच्या धर्मपत्नीच्या पुण्यस्मृतीनिमित्ताने एक विस्तीर्ण धर्मशाळा रावबहादूर सेठजींनी बांधून दिली !

वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून आमच्या रायसाहेब सेठ गोपीकृष्णजींनीही प्रयागच्या धर्मशाळेचा विस्तार तर केलाच, पण त्या ठिकाणी अनेक दुकाने निर्माण करून धर्मशाळेच्या खर्चाची नेहमीची विवंचनाही सोडवून टाकली. चित्रकूटप्रमाणे ह्या प्रयागाच्याही धर्मशाळेतून भारतातील हजारो यात्रेकरू, साधुसंत व विद्यार्जन करणारे विद्यार्थी आश्रय घेऊन स्वतःचे जीवन व्यतीत करीत असतात.

## ४. 'हाच तो तुमसरचा दानी राजा !'

रायसाहेब स्वतःच्या आईवडिलांचे श्राद्धकार्यार्थ एकदा प्रयाग, काशी आणि गया क्षेत्री गेले असताना त्या भागातील लोकांना सेठजीच्या दातृत्वाचा नि धार्मिक श्रद्धेचा जो परिचय झाला, तो अविस्मरणीय असाच म्हणावा लागेल !

गया क्षेत्राच्या मुक्कामात तर दानवीरांनी इतका विपुल दानधर्म केला की, तो बघून सारेच म्हणायचे— "हा बघा, हाच तो तुमसरचा दानी राजा ! "

खरोखरच त्याप्रसंगी सेठजींनी क्षेत्रातील सर्वच ब्राह्मण, पंडित, पुरोहित व साधुसंतांना आमंत्रित करून

प्रत्येकास यथोचित दक्षिणा आणि रेशमी शाल देऊन त्यांचा सत्कार केला !


श्रीजगन्नाथपुरीच्या यात्रेतही त्यांनी गरिबांना अन्न, वस्त्र व भरपूर प्रमाणात द्रव्यदान केले !

आणि म्हणूनच, ह्या यात्रेतील सेठजीचे प्रवासी पंडे श्रीमान वसंतलालजी दुबे हे एका लेखात म्हणतात—

" थोर सेठजी रायसाहेब गोपीकृष्णजींचा हा अतुल दानधर्म बघून तर मी अक्षरशः भारावूनच गेलो. पण त्यानंतरच्या श्री रामेश्वरम्, शिवकांची, विष्णुकांची, तिरुपती बालाजी, श्रीरंगम्, चिदम्बरम्, श्रीमीनाक्षी, मदुरा अशा अनेक क्षेत्रात त्यांच्या कर्णासमान दातृत्वाची रास बघून तर मी त्यांचे बाबतीत आश्चर्यचकित झालो व त्याच लेखात ते पुढे असेही म्हणतात की, " मला 'पंडा' ह्या नात्याने देशातील मोठमोठ्या नपतींसोबत अनेक क्षेत्री-भारतभर भ्रमण करण्याचे अनेक प्रसंग आले. पण त्या सर्व धनिकात तुमसरच्या रायसाहेब सेठ गोपीकृष्णजीसारखी महान् धार्मिक अन् महान् दानी व्यक्ती मात्र एकही आढळली नाही ! "

## ५. कुंभमेळ्याचे निमित्ताने—

प्रयाग, उजैनी, नाशिक ह्या क्षेत्री मागे जे अखिल स्वरूपाचे विशाल असे कुंभमेळे भरले होते. त्या प्रसंगी सेठजींनी त्या ठिकाणी जमलेल्या हजारो पंडितांचा



रा. ब. सेठ स्व. गोवर्धनदासजींनी बांधलेली श्री क्षेत्र चित्रकूट येथील मातोश्रीची धर्मशाळा.

आदरसत्कार तर केलाच, पण अनाथ, अपंग व रोगी अशा गरीब–लाचार जिवासाठीही 'धर्मार्थ' आयुर्वेदिक चिकित्सालये उघडून लाखो रुपयांची औषधे त्यापायी सार्थकी लावली ! उज्जैनीमध्ये तर भव्य अशा 'सेवा शिबिराची' स्थापना करून हजारो गरजूंना त्यांनी अन्न, वस्त्र, औषधे व प्याऊ इ. ची सोय केली होती. त्याचप्रमाणे श्रीकुरुक्षेत्री सूर्यग्रहणाचे प्रसंगी आणि श्री. जगदीशजी व रामेश्वरजीच्या यात्रेच्या वेळीही अनेक धार्मिक संस्थांना त्यांनी मुक्त हस्ताने दानधर्म केला आहे !

असेच रायसाहेब एकदा श्रीसेठ रा. सा. घासी-लालजी जैपुरिया यांच्या पुत्राचे लग्नप्रसंगाने कलकत्त्यास गेले आणि तेथील 'मारवाडी रिलिफ सोसायटी'ला अमाप देणगी देऊन मोकळे झाले ! आणि सेठजींचा असला दानधर्म तर असाच चालत राहणार !

## ६. होता जोंधळा पानावर दिसला !

एक जुना प्रसंग— !

सन १९३० च्या ८ ऑगस्ट रोजी तुमसर जवळील चिचोली येथेही महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार जंगल सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले गेले ! हजारो ग्रामवासी ह्या ह्या लढ्यात जंगलात जाऊन गवत व झाडे कापून तुरुंगाची वाट चालू लागले ! त्या काळात रायसाहेबांचे वडील 'ऑनररी मॅजिस्ट्रेट'च्या सरकारी हुद्यावर न्यायाधीश असून आपल्या रायसाहेबांचे वय केवळ २२–२३ वर्षांचे

होते. पण एवढ्या कोवळ्या वयातही सरकारी हुद्यावर असलेल्या वडिलांना न कळत त्यांनी जंगल सत्याग्रहातील ३–४ हजार व्यक्तींच्या भोजनाची व्यवस्था करूनच टाकली ! तसेच ४२ च्या 'चलेजाव'च्या चळवळीत जनतेला साथ देऊन रायसाहेबांनी जबलपूर व अन्य ठिकाणच्या राजबंदींसाठी संत्र्याचे पेटारे पाठविले व त्यापायी प्रसंगी इंग्रज अधिकाऱ्यांची नामर्जी पण पत्करली ! सन १९६१ च्या जुलैमध्ये सारे पुणे शहर पानशेत फुटल्यामुळे पाण्याखाली येऊन जलमय झाले असता, आमच्या रायसाहेबांनी स्वत: पुढाकार घेऊन तुमसर नगरातून ११ हजारांचा निधी पाठविण्याचा केवळ संकल्पच सोडला नाही, तर कुणाही सरकारी अधिकाऱ्यास बोलण्याची संधी न देता स्वत:जवळून तीन हजारांची देणगी त्यांनी वरील निधीसोबतच भंडारा जिल्हाधिशांचे मार्फत त्या अभागी पुण्यासाठी पाठवून दिली !

## दातव्यमिति यद्दानं दीयते नुपकारिणे।

असे आहे आपल्या रायसाहेबांचे जीवन चरित्र ! त्यांच्या जीवनातील वास्तव चित्र दिग्दर्शित करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू 'आदर्शवत' असे असून त्या सर्व पैलूत दानधर्म, सेवाभाव व सहिष्णुता हे गुण प्रकर्षाने उठून दिसतात.

तसे पाहता, आपल्या देशात तर सेवाकार्यासाठी दान देणे हे शुभचिन्ह मानले गेले असून जे सज्जन

स्वत:च्या मिळकतीतून जनताजनार्दनाच्या सत्कार्यासाठी दान देतात, ते खरोखरच देश व धर्म ह्या दोन्ही दृष्टि-कोनातून पूज्य मानले गेले आहेत.

पण दानधर्म करण्याचेही प्रकार अनेक आढळून येतात. कित्येक दानवीरांना स्वत:च्या दानशीलतेचा मोठा गर्व असतो, कित्येक लोक त्यांचेवर कोणत्या तरी स्वरूपाचा दबाब पडतो म्हणून दान करतात, तर कित्येक दानवीर स्वत:चा स्वार्थ वा प्रतिष्ठा वाढावी म्हणून दानधर्म करतात !

पण आपले सेठजी मात्र ह्या सर्व प्रकारांपेक्षा काही वेगळेच आहेत ! त्यांचे दान हे 'स्वत:चे एक मानवी कर्तव्य' समजूनच असते. अर्थात् त्यात प्रतिष्ठा नाही पण 'नि:स्वार्थी असा सेवाभाव मात्र' असतो !

श्री भगवान कृष्णाने गीतेच्या १७ व्या अध्यायात जे आदर्श दानाचे वर्णन केले आहे, त्याप्रमाणेच त्यांच्या दानाचा प्रकार असल्याचे आढळून येईल—

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे
देशे कालेच पात्रेच तद्दानं सात्विकं स्मृतम् ।।२०।।

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुन:
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ।।२१।।

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ।।२२।।

सरते शेवटी आपले दानवीर धर्मनिष्ठ व समाज-सेवक अशा ह्या सेठजींचे आयुष्य असेच समाज नि देश-कल्याणार्थ सार्थकी लागो, व त्यासाठी परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य प्रदान करो, हीच त्या दयाघनापाशी प्रार्थना करून लेखणीला विराम देतो.

धर्माज्ञा शिरि वंद्य मानुनि जनां सर्वत्र संतोषिले ।
दानाचें व्रत आचरोनि जिवनी कर्णासिहि स्पर्धिले ।।
दीनाचा कनवाळु ज्या प्रिय असे सत्संग देवाऽर्चना ।
दीर्घायूच करो तुम्हास प्रभुजी ही आमुची प्रार्थना ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... वि: ....
क्रमांक ............... नों: दि: ............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५२८
REFBK-0015289